अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १५९ । सोमवार २३ मार्च २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com

## कुंडलिनी शक्ती

**'सहजयोग'**
**भाग ४**



ही गोष्ट सर्वत्र घडत आहे आणि हे खरोखरच आश्चर्यकारक आहे कारण ज्या लोकांनी कधी देवाचे नावही ऐकले नाही किंवा जे आपल्या भारतीय संस्कृतीपासून नेहमीच वंचित राहिले, ते लोक देखील या अवस्थेत इतक्या सहजतेने 'सहज योग' प्राप्त करून घेतात.

सहजयोगाचे वर्णन तर अनेक आपल्या महाराष्ट्रात सर्व साधु-संतांनी, ज्ञानेश्वर माऊलींनी याचे ज्ञानेश्वरीत वर्णन केले आहे. पंजाबमध्ये गुरुनानक देव आणि गुरु गोविंद सिंग यांनीही हेच सांगितले आहे. त्याचप्रमाणे संत कबीरजींनी तर यावर अतिशय मोकळेपणाने भाष्य केले आहे. परंतु त्यांनी हे सर्व कवितेच्या रूपात मांडल्यामुळे लोकांना ते लवकर समजत नाही.

विशेषतः गुरुनानक साहेबांनी तर असे भाकीत केले होते की असा काळ येईल. त्याचप्रमाणे कुराणमध्येही लिहिले आहे की, जेव्हा 'कियामा'ची (पुनरुत्थानाची) वेळ येईल, तेव्हा हजारो लोक अशा प्रकारे 'वली' (सिद्ध पुरुष) होतील. येशू ख्रिस्ताने देखील हेच सांगितले आहे; सेंट जॉनच्या 'रेव्हलेशन'मध्ये (दैववाणी) असे लिहिले आहे की अशी घटना नक्कीच घडेल. या सर्व धर्मांमधील संदर्भांचा विचार केला गेला आहे.

## महत्त्वाचे..

### खरातसोबत निघणार अनेकांची 'वरात' : वडेट्टीवार

मुंबई : महिलांच्या लैंगिक शोषण प्रकरणी भोंदूबाबा अशोक खरातबरोबर बऱ्याच जणांची वरात निघणार आहे. तसेच या प्रकरणाचे जवळपास २०० व्हिडिओ आहेत. त्याची माहिती आहे. त्यामधील ९० व्हिडिओ आक्षेपार्ह आहेत. त्यात अनेक मंत्री, आयएएस आणि आयपीएस अधिकारी आहेत, असा आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

आता जे काही समोर येत आहे ते पाहता कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा असे मी म्हणेन. ही जी भोंदूगिरी चालली आहे. बनवाबनवी चालली आहे. विशेषकरून ओबीसींना मूर्ख बनवण्याचा जो धंदा चालला आहे, हे सगळे धंदे सरकार पुरस्कृत आहेत की काय? असा प्रश्न कधीकधी मला पडतो.

या प्रकरणात सरकारचे एवढे मंत्री त्यामध्ये अडकले असताना सरकारकडून कुठलीच कारवाई केली जात नाही, दखल घेतली जात नाही. महिला आयोगासारख्या जबाबदार पदावर असलेल्या नेत्यांकडून अशा किळसवाण्या व्यक्ती सोबत बघतो, हे फार विदारक आहे. या भोंदूगिरीला खतपाणी घालणारे सरकार याला जबाबदार आहे, अशी टीकाही वडेट्टीवार यांनी केली.

# व्यावसायिक गॅस पुरवठा होणार सुरू

## हॉटेल, ढाबे, उपहारगृहे, अन्न प्रक्रिया आणि दुग्धव्यवसायाला दिलासा : २० पुरवठा होणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

मुंबई : राज्यातील हॉटेल, ढाबे, उपहारगृहे तसेच औद्योगिक कॅन्टीन, अन्न प्रक्रिया आणि दुग्धव्यवसाय क्षेत्रासाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार व्यापारी एलपीजीचा अतिरिक्त २० टक्के पुरवठा करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिली.

केंद्र सरकारच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय यांनी २१ मार्च २०२६ रोजी जारी केलेल्या सूचनांनुसार, यापूर्वी राज्याला ३० टक्के एलपीजी वाटप मंजूर होते. आता २३ मार्च २०२६ पासून पुढील आदेश येईपर्यंत अतिरिक्त २० टक्के वाटप वाढविण्यात आले आहे. त्यामुळे राज्यातील एकूण गॅस पुरवठा हा पूर्वीच्या संकटपूर्व पातळीच्या सुमारे ५० टक्क्यांपर्यंत पोहोचणार आहे. या वाढीव २० टक्के वाटपात हॉटेल, ढाबे, उपहारगृहे, औद्योगिक कॅन्टीन, अन्न प्रक्रिया उद्योग आणि दुग्धव्यवसाय यांना प्राधान्य देण्यात येणार आहे.


यासोबतच राज्य शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांकडून चालविण्यात येणाऱ्या अनुदानित कॅन्टीन, कम्युनिटी किचन्स तसेच स्थलांतरित मजुरांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांनाही या निर्णयाचा लाभ मिळणार आहे.

छगन भुजबळ यांनी स्पष्ट केले की, या निर्णयामुळे व्यापारी एलपीजीच्या तुटवड्यामुळे अडचणीत आलेल्या




हॉटेल व खाद्य व्यवसायिकांना मोठा दिलासा मिळेल. मात्र, गॅस पुरवठा मिळवण्यासाठी संबंधित व्यावसायिकांनी तेल विपणन कंपन्यांकडे नोंदणी करणे तसेच पीएनजी जोडणीसाठी अर्ज करणे आवश्यक राहणार आहे.

### केरोसीन परवान्यांचे विनाशुल्क नूतनीकरण



**राज्यातील केरोसिन वितरणाबाबतही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. प्रलंबित परवाने आपोआप नूतनीकरण झाल्याचे मानण्यात येणार असून, त्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. तसेच वारसांच्या नावे परवाने तात्काळ वर्ग करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ज्या गावांमध्ये किरकोळ केरोसिन परवानाधारक उपलब्ध नाहीत, त्या ठिकाणी रास्तभाव दुकान चालविणाऱ्या दुकानदारांना किरकोळ केरोसिन परवानाधारक म्हणून मान्यता देऊन परवाना देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.**

**– छगन भुजबळ,**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री**



## हर्षवर्धन सदगीर डबल महाराष्ट्र केसरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**■ महेंद्र गायकवाडला पराभूत करून पटकावली मानाची गदा**

**पुणे :** महाराष्ट्र केसरी स्पर्धेच्या अंतिम लढतीत महेंद्र गायकवाडचा ४-३ असा पराभव करत हर्षवर्धन सदगीर याने मानाची महाराष्ट्र केसरी गदा पटकावली. गादी विभागातील विजेता हर्षवर्धन सदगीर आणि माती विभागातील विजेता महेंद्र गायकवाड यांच्यात झालेली महाराष्ट्र केसरीची अंतिम लढत अटीतटीची आणि रोमहर्षक झाली.

या अंतिम लढतीत हर्षवर्धन सदगीरने दमदार खेळ करत मानाची महाराष्ट्र केसरी गदा पटकावली. दोन्ही पहलवानांनी सुरुवातीपासूनच आक्रमक आणि तांत्रिक खेळ करत एकमेकांना जोरदार टक्कर दिली. पहिल्या काही मिनिटांत दोघांनी सावध सुरुवात केली, पण नंतर हर्षवर्धनने चपळ हालचाली आणि अचूक डावपेच वापरत आघाडी घेतली. महेंद्र गायकवाडनेही जोरदार पुनरागमन करत सामना बरोबरीत आणण्याचा प्रयत्न केला. संपूर्ण सामना अत्यंत चुरशीचा झाला आणि अखेरीस हर्षवर्धन सदगीरने ४-३ अशा निसटत्या फरकाने विजय मिळवला. शेवटच्या क्षणापर्यंत सामना कोणाच्या बाजूने झुकणार याबाबत अनिश्चितता होती. या दमदार विजयासह हर्षवर्धन सदगीरने प्रतिष्ठेची महाराष्ट्र केसरी गदा पटकावली. हा विजय त्याच्या करिअरमधील एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

# भोंदूबाबा कॅप्टन खरातच्या संपर्कात श्रीरामपूरचा 'बाबा'

## चौकशीची मागणी; सर्वत्र व्हिडिओ व्हायरल, गावात एकच चर्चा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** वादग्रस्त भोंदू बाबा कॅप्टन खरात याचे थेट कनेक्शन आता श्रीरामपूर तालुक्यातील निपाणी वडगाव येथे असल्याचे समोर येत आहे. सोशल मीडिया आणि व्हायरल रील्सच्या माध्यमातून या भागातील अनेक अंधभक्त खरातच्या संपर्कात असल्याची धक्कादायक माहिती उघडकीस आल्याने परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण आहे.

भोंदूगिरीच करून महिलांचे लैंगिक शोषण करणारा विकृत मास्टरमाईंड अशोक खरात याचे धागेदोरे आता श्रीरामपूर तालुक्यातील निपाणी वडगावपर्यंत पोहचले असून, येथील एक 'तथाकथित बाबा' दीर्घकाळापासून खरातच्या निकटवर्तीय संपर्कात असल्याची चर्चा ग्रामस्थांमध्ये रंगली आहे. केवळ हे बाबा नव्हे,



तर गावातील अनेक तरुण आणि अंधभक्त या जाळ्यात ओढले गेले आहे. सोशल मीडियावरील काही फोटोंमुळे आणि खरातसोबत असलेल्या व्हिडिओंमुळे या संशयाला अधिक बळ मिळाले आहे.

**संतप्त ग्रामस्थांनी या तथाकथित महाराजांची चौकशी करावी. निपाणी वडगावमधील आणखी किती व्यक्ती या भोंदूगिरीच्या आणि गुन्हेगारी जाळ्यात अडकल्या आहेत, याचा छडा लावण्यासाठी विशेष पथकामार्फत चौकशी व्हावी. अशा विकृत आणि भोंदू लोकांमुळे तरुण पिढी भरकटली जात आहे. पोलीस प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने चौकशी सुरू करावी, अशी मागणी निपाणी वडगाव ग्रामस्थांनी केली आहे.**

## दोन बिबटयांच्या झुंजीत एका बिबट्याचा मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** बेलापूर येथून जवळच असलेल्या वळदगाव शिवारातील श्री. हरिष भोसले यांच्या शेतातील आंब्याच्या बागेलगत दोन बिबटयांच्या झालेल्या जोरदार झुंजीत एका बिबट्याचा अंत झाला आहे. शनिवारी मध्यरात्री दोन बिबट्याची येथे जोरदार लढत झाली. त्यात नर जातीच्या बिबट्याचा अंत झाला असल्याचे सांगण्यात येते.हरिष भोसले नेहमीप्रमाणे सकाळी शेतात गेले असता ही घटना त्यांच्या निदर्शनास आली.



यावेळी मृत बिबट्याला पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. त्यानंतर वन विभागाचे अधिकारी अक्षय बडे यांच्याशी संपर्क साधुन त्यांना ही माहिती देण्यात आली. त्यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन वरिष्ठाच्या आदेशानुसार मृत बिबट्याचे शव विच्छेदन करुन अंत्यसंस्कार केले. विल्हेवाट लावण्यात आली. गेल्या महिन्यातही येथून नजिकच असलेल्या उंबरगाव शिवारात टेकावडे वस्तीलगत अशीच घटना घडली असल्याचे सांगण्यात आले.

# मोदींचा सत्ताविक्रम

## सत्तेतील ८,९३१ दिवसांचा कार्यकाळ पूर्ण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८,९३१ दिवसांचा कार्यकाळ पूर्ण करत देशातील सर्वाधिक काळ सत्तेत राहणारे नेते म्हणून नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. त्यांनी सिक्कीमचे माजी मुख्यमंत्री पवन कुमार चामलिंग यांचा ८,९३० दिवसांचा विक्रम मागे टाकला आहे.

या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पंतप्रधान मोदींच्या कामाचे कौतुक केले. त्यांनी म्हटले की, पीएम मोदी यांच्या दशकांतील सेवेमुळे देशात विकास, जनकल्याण आणि जागतिक स्तरावर भारताची प्रतिष्ठा वाढली आहे. गरीबांना हक्क मिळवून देणे, विकासाचे नवे विक्रम निर्माण करणे आणि जागतिक मंचावर भारताचा सन्मान वाढवणे यामुळे देशात मोठा बदल झाला आहे.

शाह पुढे म्हणतात, पंतप्रधान मोदींनी २४ वर्षांहून अधिक काळ एकही सुट्टी न घेता देशसेवा केली, हे त्यांच्या समर्पणाचे मोठे उदाहरण आहे. त्यामुळेच त्यांना देशातील जनतेचे मोठे प्रेम आणि समर्थन मिळाले आहे.

नरेंद्र मोदी तीन वेळा गुजरातचे मुख्यमंत्री आणि तीन वेळा भारताचे पंतप्रधान झाले. त्यांनी २०१४, २०१९ आणि २०२४ या लोकसभा निवडणुकांमध्ये भाजपला पक्षाला विजय मिळवून दिला. गुजरातचे मुख्यमंत्री आणि नंतर पंतप्रधान म्हणून त्यांनी एकूण ८,९३१ दिवस पदावर राहून देशातील सर्वाधिक काळ शासन करणारे नेते म्हणून विक्रम केला आहे.



### सोशल मीडियावरही सर्वाधिक लोकप्रियता

**मार्च महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या यूट्यूब चॅनलवर ३ कोटी सबस्क्राइबर पूर्ण झाले. तसेच इंस्टाग्रामवर त्यांचे १० कोटी फॉलोअर्स असून, ते जगातील सर्वाधिक फॉलो केले जाणाऱ्या नेत्यांपैकी एक आहेत.**

# प्रदेशाध्यक्षपदावरुनही रुपाली चाकणकरांची उचलबांगडी होणार!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** विकृत भोंदूबाबा अशोक खरात याच्याशी लागेबांधे असल्यामुळे राज्य महिला आयोगाचे अध्यक्षपद गमवावे लागलेल्या रुपाली चाकणकर यांची लवकरच राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्षपदावरुनही उचलबांगडी होण्याची दाट शक्यता आहे.

खरातला गुरु करुन घेतल्यामुळे रुपाली चाकणकर यांच्यावर विरोधी पक्षांकडून टीकेची प्रचंड झोड उठवण्यात आली होती. महिलांचे लैंगिक शोषण करणाऱ्या व्यक्तीला गुरु मानणारी महिला महिला आयोगाची अध्यक्ष कशी काय असू शकते, असा सवाल उपस्थित करण्यात आला होता. त्यामुळे रुपाली चाकणकर यांना नाईलाजाने राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदावरुन पायउतार व्हावे लागले होते.



उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या मुंबईतील देवगिरी बंगल्यावर शनिवारी रात्री राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार यांची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत अशोक खरात प्रकरणामुळे राष्ट्रवादी काँग्रेसची होणारी बदनामी कशी रोखता येईल, यासंदर्भात चर्चा झाल्याचे समजते. त्यासाठी रुपाली चाकणकर यांच्याकडून राष्ट्रवादी काँग्रेसचे महिला प्रदेशाध्यक्षपदही काढून घेतले जाऊ शकते. काल देवगिरी बंगल्यावर ही बैठक सुरु असताना रुपाली चाकणकर यांना तसा संदेश धाडण्यात आल्याची सूत्रांची माहिती आहे. त्यामुळे रुपाली चाकणकर लवकरच राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा देऊ शकतात. रुपाली चाकणकर यांच्यानंतर राज्य महिला आयोगाचा अध्यक्ष आणि प्रदेशाध्यक्ष म्हणून कोणाची नेमणूक करायची, याबाबतही काल देवगिरी बंगल्यावरील बैठकीत चर्चा झाल्याचे समजते.

सुनील तटकरे हे रुपाली चाकणकर यांचे राजकीय गॉडफादर असल्याचा आरोप सातत्याने होत आहे. मात्र, सुनेत्रा पवार यांच्यासोबतच्या देवगिरी बंगल्यावरील बैठकीनंतर सुनील तटकरे यांनीही रुपाली चाकणकर यांच्यावरील वरदहस्त काढून घेतल्याची चर्चा रंगली आहे. सुनील तटकरे यांना रुपाली चाकणकर यांच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाच्या राजीनाम्याबाबत पत्रकारांनी विचारले असता त्यांनी म्हटले की, या विषयावर चर्चा होईल, तेव्हा निर्णय घेतला जाईल. पक्षाकडून कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. अशोक खरात याने दुष्कृत्य केले आहे आणि एसआयटीकडून त्याची सखोल चौकशी व्हावी, ही राष्ट्रवादी काँग्रेसची स्पष्ट भूमिका आहे. रुपाली चाकणकर यांचा महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा पक्षाने स्वीकारला आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आता तो राजीनामा मुख्यमंत्र्यांकडे पाठवतील. हा राजीनामा स्वीकारण्यात यावा, अशी शिफारस आम्ही मुख्यमंत्र्यांना करु, असे सुनील तटकरे यांनी म्हटले.



### निष्पक्ष चौकशीसाठी...


**रूपाली चाकणकर महिला आयोगाच्या अध्यक्ष होत्या. महिलांसोबत दुर्व्यवहार करणाऱ्या व्यक्तीशी त्यांचा जवळचा संबंध आहे किंवा त्यांनी त्यांना गुरुस्थानी मानले आहे. अशा परिस्थितीत या सगळ्या विषयाला न्याय मिळणार नाही, हे त्यांनीही मान्य केले आणि त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.**

**– देवेंद्र फडणवीस,**
**मुख्यमंत्री**

## माजी मंत्री दत्ता मेघे यांचे निधन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नागपूर :** विदर्भातील ज्येष्ठ राजकारणी, शिक्षणतज्ज्ञ व समाजसेवक तथा राज्याचे माजी मंत्री दत्ता मेघे यांचे रविवारी (२२ मार्च) नागपूर येथे निधन झाले. ते ९० वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने विदर्भासह राज्याच्या राजकीय, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.



मेघे यांचा जन्म ११ नोव्हेंबर १९३६ रोजी वर्धा जिल्ह्यातील पवनार येथे झाला होता. त्यांनी आपल्या दीर्घ राजकीय कारकिर्दीत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस तसेच भाजपमध्ये काम करत चार वेळा लोकसभा खासदार म्हणून नागपूर, रामटेक व वर्धा मतदारसंघांचे प्रतिनिधित्व केले. याशिवाय राज्यसभा सदस्य तसेच महाराष्ट्र विधानपरिषदेतही त्यांनी महत्त्वाची जबाबदारी पार पाडली होती.

राजकारणासोबतच त्यांनी शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय काम केले. 'नागर युवक शिक्षण संस्था'च्या माध्यमातून तसेच' दत्ता मेघे इन्स्टीट्यूट ऑफ मेडीकल सायन्स'सारख्या संस्थांच्या उभारणीतून त्यांनी ग्रामीण भागात शिक्षण व आरोग्य सुविधा पोहोचवल्या. त्यांच्या कार्यामुळे विदर्भातील हजारो विद्यार्थ्यांना संधी मिळाली. मेघे हे विदर्भ राज्याच्या मागणीचे समर्थक म्हणूनही ओळखले जात होते. त्यांच्या कुटुंबातील पुढील पिढीही राजकारणात सक्रिय असून पुत्र समीर मेघे आमदार आहेत. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच विविध क्षेत्रांतून शोक व्यक्त करण्यात येत आहे.

संपादकीय

# संसदेतील गोंधळ थांबवा हो...

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा आता संपत आला आहे. पाच राज्यांतील विधानसभा निवडणुका जाहीर झाल्यामुळे राजकीय पक्षांचे लक्ष काही प्रमाणात निवडणुकांकडे वळले आहे आणि त्याचा परिणाम अधिवेशनातील कामकाजावरही दिसून येतो. वित्त विधेयक मंजूर झाल्यानंतर हे अधिवेशन संपणार असल्याने उर्वरित काळात तरी कामकाज सुरळीत पार पडावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

या अधिवेशनात एक महत्त्वाची घटना म्हणजे विरोधी पक्षांच्या आठ सदस्यांचे निलंबन मागे घेणे. सुरुवातीला गोंधळ घातल्यामुळे या सदस्यांना उर्वरित अधिवेशनासाठी निलंबित करण्यात आले होते. मात्र, आता त्यांचे निलंबन अटींसह मागे घेण्यात आले आहे. हा निर्णय सरकारच्या सकारात्मक भूमिकेचे उदाहरण म्हणता येईल, पण त्याचवेळी सभागृहातील शिस्त राखण्याची गरजही अधोरेखित करतो.

संसद ही केवळ कायदे करण्याची जागा नाही, तर ती देशाच्या लोकशाहीचे प्रतीक आहे. येथे देशातील विविध प्रश्नांवर सखोल चर्चा होऊन निर्णय घेतले जातात. सामान्य जनतेच्या अपेक्षा, समस्या आणि आशा–आकांक्षा यांना वाचा फोडण्याचे हे महत्त्वाचे व्यासपीठ आहे. त्यामुळे संसद चालणे आणि ती प्रभावीपणे काम करणे अत्यंत आवश्यक आहे.

पूर्वीच्या काळात संसदेतील वातावरण अधिक सुसंवादी आणि अभ्यासपूर्ण होते. सत्ताधारी आणि विरोधी पक्ष एकमेकांचे विचार ऐकत आणि आदराने संवाद साधत. विरोधकांकडून केलेली टीका ही तर्कशुद्ध आणि मुद्देसूद असायची. सत्ताधाऱ्यांनाही त्या टीकेचा स्वीकार करून योग्य ते बदल करण्याची तयारी असायची. त्यामुळे लोकशाही अधिक मजबूत होत असे.

मात्र, गेल्या काही वर्षांत परिस्थिती बदललेली दिसते. आज संसदेत अनेकदा गोंधळ, घोषणाबाजी, पोस्टरबाजी आणि अध्यक्षांच्या आसनासमोर येऊन आंदोलन करणे असे प्रकार वाढले आहेत. काही वेळा विधेयकांच्या प्रती फाडून फेकण्याचेही प्रकार घडले आहेत. हे सर्व प्रकार लोकशाहीच्या दृष्टीने अजिबात योग्य नाहीत.

विरोधी पक्षांचे काम सरकारवर टीका करणे आणि त्यांना जबाबदार धरणे हेच आहे. जर सरकार चुकीचे निर्णय घेत असेल किंवा जनहिताकडे दुर्लक्ष करत असेल, तर त्याविरोधात आवाज उठवणे आवश्यक आहे. मात्र, ही टीका तथ्यांवर आधारित आणि तर्कसंगत असली पाहिजे. फक्त विरोध करण्यासाठी विरोध करणे ही लोकशाहीची योग्य पद्धत नाही.

त्याचप्रमाणे, सत्ताधारी पक्षानेही विरोधकांना शत्रू मानण्याऐवजी त्यांचे मत ऐकून घेणे गरजेचे आहे. लोकशाहीत सत्ताधारी आणि विरोधक हे दोन्ही पक्ष महत्त्वाचे असतात. दोघांनीही एकमेकांचा आदर राखून काम केल्यासच लोकशाही मजबूत राहते.

संसदेतील गोंधळाचा सर्वात मोठा परिणाम म्हणजे कामकाज ठप्प होणे. वारंवार गोंधळ झाल्यास अध्यक्ष किंवा सभापती यांना कामकाज स्थगित करावे लागते. त्यामुळे महत्त्वाचे विषय चर्चेविना राहतात. विशेषतः प्रश्नोत्तराचा तास हा अत्यंत महत्त्वाचा असतो, कारण या वेळेत सदस्यांना सरकारला थेट प्रश्न विचारण्याची संधी मिळते. मात्र, गोंधळामुळे हा वेळ वाया जातो.

याचा तोटा सर्वाधिक विरोधी पक्षांनाच होतो. कारण त्यांना सरकारला जाब विचारण्याची आणि जनतेचे प्रश्न मांडण्याची संधी गमवावी लागते. त्यामुळे गोंधळ घालून विरोध करण्याऐवजी चर्चेतून आणि मुद्देसूद प्रश्नांमधून सरकारला अडचणीत आणणे अधिक प्रभावी ठरू शकते.

संसदेतील काही घटनांनी तर लोकशाहीबाबत चिंता वाढवली आहे. काही वेळा पंतप्रधानांनाही बोलू दिले जात नाही, ही बाब अत्यंत गंभीर आहे. तसेच सदस्यांमध्ये होणारे आक्रमक वर्तनही चिंताजनक आहे. अशा घटनांमुळे संसदेची प्रतिमा खराब होते आणि जनतेमध्ये निराशा निर्माण होते.

संसद ही देशातील १४० कोटी लोकांच्या अपेक्षांचे केंद्र आहे. येथे होणारे कामकाज पाहून जनतेचा लोकशाहीवर विश्वास टिकतो किंवा कमी होतो. त्यामुळे प्रत्येक सदस्याने आपली जबाबदारी ओळखून वागणे आवश्यक आहे.

आजची गरज म्हणजे गोंधळ थांबवून चर्चेला प्राधान्य देणे. विरोधकांनी आपली भूमिका ठामपणे मांडावी, पण ती सभ्य आणि शिस्तबद्ध पद्धतीने मांडावी. सत्ताधाऱ्यांनीही विरोधकांना योग्य प्रतिसाद देऊन त्यांचे प्रश्न गांभीर्याने घ्यावेत. जर संसद सुरळीत चालली आणि मुद्देसूद चर्चा झाली, तरच देशाच्या विकासासाठी योग्य निर्णय घेतले जाऊ शकतात. अन्यथा, गोंधळ आणि आरोप–प्रत्यारोपांमध्ये मौल्यवान वेळ वाया जात राहील.

एकूणच, संसदेतील सर्व पक्षांनी आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. लोकशाही टिकवायची असेल, तर संवाद, संयम आणि परस्पर आदर या मूल्यांना प्राधान्य द्यावे लागेल. तेव्हाच संसद खऱ्या अर्थाने जनतेच्या हितासाठी काम करू शकेल.

# शिवरायांच्या पुतळा विटंबन प्रकरणी हायकोर्टात याचिका

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**राहुरी** : शहरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या विटंबना प्रकरणाला एक वर्ष पूर्ण झाले असतानाही संबंधित आरोपींचा अद्याप शोध लागलेला नाही. या पार्श्वभूमीवर वर्षभर विविध आंदोलने व निदर्शने करूनही तपास यंत्रणेला यश न आल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

या प्रकरणी राहुरी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती साहेबराव म्हसे यांनी औरंगाबाद खंडपीठात प्रशासनाविरोधात याचिका दाखल केली आहे. धानोरे (ता. राहुरी) येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी यासंदर्भातील माहिती दिली.

दाखल याचिकेत गृहमंत्रालय, पोलीस अधीक्षक कार्यालय (अहिल्यानगर), राहुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक तसेच तपासी अधिकारी यांना प्रतिवादी करण्यात आले आहे. विटंबना करणाऱ्या आरोपींचा तात्काळ शोध घेऊन त्यांना अटक करण्याची मागणी याचिकेत करण्यात आली आहे. दरम्यान, ही याचिका हायकोर्टात ॲड. हेमंत ढगे मांडत असून त्यांना ॲड. अथर्व म्हसे यांचे सहकार्य लाभत आहे, अशी माहितीही यावेळी देण्यात आली.

या पत्रकार परिषदेला धनेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष जयवंतराव दिघे, सचिव गणेश दिघे यांच्यासह सतीश दिघे, निलेश दिघे, नंदकुमार दिघे, अमोल दिघे, सागर दिघे, सुनील मुसमाडे, शहाजीराव दिघे, राजेंद्र दिघे, जयराम दिघे, सुनील हिवाळे, अर्जुन म्हसे, आदिनाथ पेरणे आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तीर्थयात्रांसाठी कडक नियमांची गरज : गणेश जाधव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणतांबा** : तीर्थस्थळांच्या यात्रेबाबत राज्य सरकारने कडक नियमावली लागू करावी, अशी मागणी मनसे राहाता तालुका अध्यक्ष गणेश जाधव यांनी परिवहन मंत्री प्रतापराव सरनाईक यांच्याकडे केली आहे.

१४ मार्च रोजी उज्जैन–कानपूर महामार्गावरील इस्पातनगर पुलावर तीर्थयात्रेसाठी निघालेल्या आराम बसची उभ्या डंपरवर धडक होऊन ३ भाविकांचा मृत्यू झाला, तर ४० जण गंभीर जखमी झाले. या घटनेमुळे भाविकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या अपघातासाठी चालकाबरोबरच यात्रा आयोजकही तितकेच जबाबदार असल्याचे जाधव यांनी म्हटले आहे.

**सध्या ग्रामीण व शहरी भागात अनधिकृत यात्रा आयोजक व कंपन्यांची संख्या वाढली असून, भाविकांची आर्थिक व मानसिक फसवणूक होत आहे. त्यामुळे यात्रेसाठी परवानगी, नोंदणी अनिवार्य करावी, तसेच ७ दिवसांपेक्षा अधिक कालावधीच्या यात्रेसाठी किमान दोन चालकांची सक्ती करावी, अशी मागणी त्यांनी केली. या संदर्भात मनसेचे शिष्टमंडळ लवकरच परिवहन मंत्र्यांची भेट घेणार असल्याचेही जाधव यांनी सांगितले.**

# श्री विरभद्र महाराजांच्या यात्रेनिमित्त पारंपरिक कुस्ती आखाडा



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी :** कोल्हार खुर्द येथील ग्रामदैवत श्री विरभद्र (बिरोबा) महाराजांच्या यात्रेनिमित्त पारंपरिक कुस्ती आखाडा व विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहात आणि शांततेत पार पडले. हिंदू नववर्षाच्या गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर यात्रेला सुरुवात करण्यात आली.

यात्रेच्या पहिल्या दिवशी पुणतांबा येथून पवित्र गंगाजल कावडीतून आणून सकाळी बिरोबा महाराजांना अभिषेक करून पूजा करण्यात आली. सायंकाळी डफ वाद्यांच्या तालावर काठीची मिरवणूक काढण्यात आली. गावातील प्रत्येक घरासमोर काठीचे पूजन करण्यात आले. त्यानंतर मंदिरासमोर पारंपरिक 'वहीक' सांगण्याची प्रथा पार पडली, ज्यामध्ये वर्षभराचे भविष्य कथन करण्यात येते. यानंतर वाघ्या–मुरळींच्या जागरणाचा कार्यक्रम रंगला. तसेच पुरातन परंपरेनुसार 'दसावतारी खेळ' सादर करण्यात आला. रामायणातील प्रसंगांचे जिवंत देखावे संबळ व सनईच्या सुरावटीत सादर करण्यात आले. हा कार्यक्रम रात्रभर चालून पहाटे देवीच्या मुखवट्याची आरती करून समारोप झाला.

दुसऱ्या दिवशी सायंकाळी ४ वाजता कुस्ती आखाड्याला नारळ फोडून सुरुवात करण्यात आली. बाहेरगावाहून आलेल्या नामांकित पैलवानांच्या कुस्त्या रंगल्या. या यात्रेचे नियोजन सरपंच दिगंबर शिरसाठ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष सोपान शिरसाठ, बाळासाहेब शिरसाठ, पोलीस हेड कॉन्स्टेबल देविदास कोकाटे, तसेच राजू वरपे, भागवत शिरसाठ, प्रकाश चिखले, बापूसाहेब लोखंडे, संतोष शिरसाठ, गणेश ढाकणे, ज्ञानदेव शिरसाठ, डॉ. संतोष शिरसाठ, रामनाथ शिरसाठ, भाऊसाहेब लोंढे, गोपीनाथ दळे, दिगंबर घोगरे, ज्ञानदेव घोगरे, गाढे पाटील, बाबजी शिरसाठ, दिलीप घोगरे आदींसह ग्रामस्थांनी परिश्रम घेतले. एकूणच, श्री विरभद्र (बिरोबा) महाराजांची यात्रा पारंपरिक पद्धतीने आणि आनंदमय वातावरणात यशस्वीरीत्या पार पडली.

# संजीवनी इंजिनीअरिंगच्या सहा विध्यार्थ्यांची जॉन्सन कंपनीत निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**कोपरगावः** जॉन्सन कंट्रोल्स इंटरनॅशनल या नामांकीत कंपनीने संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या सहा विध्यार्थ्यांना अंतिम वर्षाच्या परिक्षेचा निकाल लागण्यापूर्वीच चांगल्या पगाराच्या नोकरीची संधी दिली. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या नियोजनबध्द पुढाकारामुळे हे शक्य झाले. या विभागाच्या माध्यमातून नामांकित कंपन्याना हवे असलेले कुशल मनुष्यबळ तयार करण्याच्या दृष्टीने विध्यार्थ्यांची तयारी करून घेतली जाते. त्यामुळे बऱ्याचदा परिक्षेच्या निकालापूर्वीच विध्यार्थ्यांच्या हाती नोकरीची आर्डर मिळालेली असते, अशी माहिती संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजने प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

जॉन्सन कंट्रोल्स इंटरनॅशनल पी एल सी या नामांकित कंपनीत चांगल्या पॅकेजची नोकरी मिळाल्याने या विद्यार्थ्यांचे भवितव्य उज्वल झाले. गुणवत्ता केंद्रित शिक्षण पद्धती आणि उद्योगाभिमुख प्रशिक्षणामुळे हे शक्य होते. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये मेकॅनिकल इंजिनिअरींगच्या रोहीत सुनिल काकड, अमोल अशोक खेडकर, इलेक्ट्रिकल इंजिनिअरींगच्या वैष्णवी भाऊसाहेब लहरे, समर्थ बाळासाहेब पवार, सौरभ बाबासाहेब पवार व मेकॅट्रॉनिक्स इंजिनिअरींगच्या साई सोमनाथ बनकर यांचा समावेश आहे.

ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाकडून विविध कंपन्यांच्या व्यवस्थापना सोबत सातत्याने संपर्क ठेवला जातो. औद्योगिक क्षेत्रातील तंत्रज्ञान सातत्याने बदलते. त्यानुसार विध्यार्थ्यांना नेमके कसे प्रशिक्षीत करणे गरजेचे आहे याबाबत या कंपन्यांच्या व्यवस्थापनाकडून माहिती करून घेतले जाते. त्यानुसार विध्यार्थ्यांना नव्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्यावर भर दिला जातो. विद्यार्थ्यांची तांत्रिक तयारी पूर्ण झाली की या कंपन्या नव्या तंत्रज्ञानाने परिपूर्ण झालेल्या या विध्यार्थ्यांना नोकरी देताना प्राधान्य देतात. कंपन्याकडून विध्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या जातात. त्यासाठी आवश्यक असलेले सॉफ्ट स्किल्स, कम्युनिकेशन स्किल्स आणि आत्मविश्वास वाढविण्यासाठी प्रशिक्षण दिले जाते.

महाविद्यालयातील या सर्वांगीण प्रशिक्षण प्रक्रियेचा विध्यार्थ्यांना मोठा फायदा होत असून, त्यांना उच्च दर्जाच्या नोकरीच्या संधी उपलब्ध होत आहेत. ग्रामीण भागात स्थित असूनही संजीवनी इंजिनीअरिंग कॉलेज आधुनिक उद्योगांसाठी कुशल आणि प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्यात अग्रस्थानी आहे, हे या यशातून पुन्हा अधोरेखित झाले आहे.



# अमृतवाहिनी पॉलिटेक्निकच्या ७९ विद्यार्थ्यांची टाटा मोटर्स पुणे येथे निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** अमृतवाहिनी पॉलिटेक्निक, संगमनेर या संस्थेच्या विद्यार्थ्यांनी प्लेसमेंट क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. नामांकित टाटा मोटर्स, पुणे येथे संस्थेतील एकूण ७९ विद्यार्थ्यांची यशस्वी निवड झाली आहे.

विभागानिहाय निवडीत मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील ३९, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनियरिंग विभागातील २३ तसेच मेकॅट्रॉनिक्स विभागातील १७ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मराजीमंत्री बाळासाहेब थोरात,मा.आ.डॉ.सुधीर तांबे, शरयू देशमुख, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, मॅनेजर तसेच तंत्रनिकेतनचे प्राचार्य व्ही.बी.घुमाळ, डायरेक्टर अकॅडेमिक डॉ.जे.बी.गुरव, उपप्राचार्य जी.बी. काळे यांनी विद्यार्थ्यांचे तसेच विभागप्रमुख व शिक्षकांचे कौतुक केले.

या प्लेसमेंटसाठी संस्थेचे सेंट्रल प्लेसमेंट संयोजक डॉ.रमेश पावसे, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी प्रा. एस. एस. गंधे व टीम मेंबर प्रा. एस. व्ही.देशमुख, प्रा. एम. बी. सातपुते, प्रा. वनम व्ही.एस., प्रा. बोऱ्हाडे जी. एल. यांनी विशेष कष्ट घेतले.

ही निवड म्हणजे अमृतवाहिनी पॉलिटेक्निक, संगमनेर येथील गुणवत्तापूर्ण शिक्षण, कौशल्यविकासावर आधारित प्रशिक्षण व प्रभावी प्लेसमेंट मार्गदर्शनाची पावती असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# सण उत्सवातून निर्माण झालेले ऐक्याचे वातावरण कायम जपले जावे : विवेक कोल्हे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : शहरातील विविध ठिकाणी रमजान ईद निमित्त सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी कारखान्याचे चेअरमन युवानेते विवेक कोल्हे यांनी उपस्थित राहून मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक, मुस्लिम बांधव व प्रतिष्ठित मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना विवेक कोल्हे म्हणाले की, रमजान ईद हा एकात्मतेचा आणि सद्भावनेचा संदेश देणारा सण आहे. महिनाभर उपवास करणाऱ्या मुस्लिम बांधवांच्या श्रद्धेचा आणि समर्पण भावनेचा गौरव या निमित्ताने सर्वांनी साजरा केला. पवित्र रमजान महिन्याच्या शेवटी संपूर्ण समाजाने एकत्र येऊन प्रेम, बंधुत्व आणि सलोख्याचा संदेश देणे महत्त्वाचे आहे.

स्वर्गीय शंकरराव कोल्हे साहेबांपासून गेल्या चाळीस ते पन्नास वर्षांपासून ईद निमित्त इफ्तारचे आयोजन केले जात असून या वर्षी देखील विविध ठिकाणी इफ्तार पार्टी आणि मज्जितमध्ये फळांचे बॉक्स कोल्हे कुटुंबाकडून पाठविले गेले. या उपक्रमामुळे सर्व समाजात सलोखा वाढतो, धार्मिक ऐक्य वृद्धिंगत होते आणि परस्पर सहकार्याची भावना निर्माण होते. कोल्हे परिवाराने नेहमीच तालुक्यात शांतता, बंधुत्व आणि विकास जपण्यासाठी पुढाकार घेतला आहे. विवेक कोल्हे यांनी पुढे सांगितले की, सण आणि उत्सव हे समाजाला एकत्र आणण्याचे माध्यम आहेत. त्यामुळे अशा प्रसंगी परस्पर सौहार्द वाढवण्यासाठी सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे. कोल्हे परिवाराच्या वतीने सर्व मुस्लिम बांधवांना ईदच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या आणि येणारे दिवस आनंदाचे, सुखाचे व भरभराटीचे जावोत अशी प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली.

या प्रसंगी नगराध्यक्ष पराग संधान, उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर,गटनेते, सर्व समिती सभापती, सर्व नगरसेवक, आजी माजी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# रामेश्वर नाईक यांचे सपत्नीक भगवान दत्तात्रयांचे दर्शन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासाः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष कार्य अधिकारी व मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मदाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी नेवासा तालुक्यातील शनिशिंगणापूर व देवगड येथे भेट देऊन शनैश्वरांचे व भगवान दत्तात्रयांचे दर्शन घेतले राज्यातील जनतेच्या निरोगी आयुष्यासाठी त्यांनी प्रार्थना केली.


छाया–सुधीर चव्हाण नेवासा

शनिशिंगणापूर येथे शनैश्वर देवस्थान व भारतीय जनता पार्टी पदाधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत करून सत्काराद्वारे सन्मान केला.

श्री क्षेत्र देवगड येथे त्यांचे आगमन झाले असता राष्ट्रसंत महंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांनी त्यांचे स्वागत करून शाल श्रीफळ देऊन सन्मान केला.शनैश्वरांचा महिमा अगाध असल्याचे सांगून त्यांनी देवगड क्षेत्राचा निसर्गरम्य परिसर व स्वच्छता पाहून समाधान व्यक्त केले.

यावेळी भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष सचिनभाऊ देसरडा,ऋषिकेश शेटे पाटील यांनी

रामेश्वर नाईक यांचा भाजपच्या वतीने त्यांचा शाल श्रीफळ देऊन सन्मान केला.आयुष्मान भारत मिशनचे जिल्हाध्यक्ष सचिन काळे,नेवासा नगरपंचायतचे नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले,देवगड मुरमे गावचे सरपंच अजय साबळे पाटील,भागवत शिरसाठ, विलास भुजबळ, दिपक दरंदले, कृष्णा डहाळे यांच्यासह भाजपा महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# औद्योगिक क्षेत्रातील गॅस तुटवडा दूर करण्यासाठी सरकारचे प्रयत्न : ना. विखे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहील्यानगर** : औद्यगिक क्षेत्रासमोर निर्माण झालेल्या गॅस तुटवड्याचा प्रश्न सोडविण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. स्थानिक पातळीवर जिल्हाधिकारी, औद्यगिक विकास महामंडळाचे क्षेत्रीय यांनी एकत्रितपणे गॅस वितरणातील त्रृटी दूर करण्यासाठी पुढकार घेण्याच्या सूचना जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या. अहील्यानगर तसेच जिल्ह्यातील अन्य औद्यगिक वसाहती मध्ये गॅस टंचाईमुळे निर्माण झालेल्या समस्यांच्या पार्श्वभूमीवर मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत औद्योगिक वसाहतीच्या कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

महापौर ज्योती गाडे जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया औद्यगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी गणेश राठोड,जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती हेमा बडे स्थायी समितीचे अध्यक्ष सुभाष लोंढे भाजपाच्या उद्योग आघाडीचे अनंत देसाई आमी संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खताळ बीपीसीएलचे मार्केटींग ऑफीसर मनोज जाधव,एलपीजीचे समन्वय



अधिकारी सूर्यवंशी एचपीसीएलचे ब्रजेशकुमार यांच्यासह उद्योजक उपस्थित होते. मंत्री विखे यांनी बैठकीत औद्यगिक क्षेत्राकरीता आवश्यक असलेल्या गॅस पुरवठ्याचा आढावा घेतला.याबाबत उद्योजकांनी आपल्या समस्यांची माहीती मंत्र्यासमोर मांडली.

जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे यांनी केंद्र व राज्य सरकारकडून आलेल्या नव्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे शैक्षणिक संस्था वसतिगृह औद्योगिक वसाहती मधील कॅन्टीन,यांना वितरीत करण्यात येणार्या गॅसची माहीती सादर केली. बैठकीत उपस्थित असलेल्या उद्योकांनी मांडलेल्या समस्यामध्ये प्रामुख्याने पीएनजी वाहीन्यांच्या जोडण्या होत नसल्याचे निदर्शानास आणून दिले.याबाबत मार्केटींग ऑफीसर मनोज जाधव यांनी बाराशे ते तेराशे कनेक्शन आतापर्यंत जोडले असल्याची माहीती दिली. सर्व उद्योजक कनेक्शन घेण्यास तयार असले तरी कंपनीकडे असलेल्या अपुर्या यंत्रणेमुळे कनेक्शन जोडण्यात अडचणी असल्याचे निदर्शानास येताच मंत्री विखे यांनी सर्व कंपन्याचे करारनामे पूर्ण करण्यासाठी मनुष्यबळ उपलब्ध करून द्याने मराठा चेंबर्सच्या किंवा औद्योगिक वसाहतीच्या कार्यालयता स्वतंत्र यंत्रणा सुरू करण्याच्या सूचना दिल्या.ज्या कंपन्यांना कनेक्शन दिले त्यांना तातडीने गॅस पुरवठा सुरू करण्याचे तसेच कंपन्याचे सहकार्य चेवून जोडण्याचे काम पूर्ण करण्याचे निर्देश मंत्री विखे यांनी दिले. कंपन्यांशी झालेल्या कराराप्रमाणे वितरीकांच्या जोडण्या पूर्ण कशा होतील यासाठी जिल्हाधिकार्यांनी स्वत: कंपन्याचे प्रतिनिधी उद्योजक यांचा समन्वय साधून या कामातील त्रृटी तातडीने दूर करण्यासाठी पुढाकार घेण्याचे सुचित करून शहरातही चाळीस हजार घरगुती जोडण्या झालेल्या आहेत.मात्र महापालिकेने वाढविलेल्या दरामुळे काम थांबल्याचे सांगण्यात आले.

मात्र महापालिकेने याबाबत योग्य मार्ग काढावा अशा सूचना मंत्री विखे यांनी महपौर ज्योती गाडे आणि स्थायी समितीचे अध्यक्ष सुभाष लोंढे यांना दिल्या. जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या परीस्थितीमुळे निर्माण झालेल्या आव्हनात्मक परिस्थितीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या उपाय योजनामुळे देश खंबीरपणे उभा आहे.उद्योजकांच्या काही मागण्याबाबत राज्य स्तरावरील प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करण्याची ग्वाही मंत्री विखे पाटील यांनी दिली. औद्योगिक वसाहती मधील कॅन्टीन करता पन्नास टक्के गॅस उपलब्ध होणार असल्याने कामगारांना त्याचा दिलासा मिळेल. पाच दिवस काम सुरू ठेवण्याच्या निर्णयाबाबत उद्योजकांनी एकत्रित येवून निर्णय करावा. अनेक छोटे उद्योग मोठ्या उद्योगांना पुवरठा करतात. त्यामुळे कामगारांचे स्थलांतर होणार नाही याची दक्षता घेण्यासाठी उद्योजकांच्या बरोबरीने प्रशासन सुध्दा तेवढी दक्षता घेईल. पाच किलो वजनाचे गॅस सिलेंडर उपलब्ध होत आहे.

केरोसीनचा पर्याय सुध्दा उपलब्ध होत असल्याचे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले. औद्योगिक वसाहती मधील सर्व अतिक्रमण काढून टाकण्यासाठी प्रादेशिक अधिकारी राठोड यांनी पुन्हा सूरूवात करावी अनेक टपर्यामध्ये अवैध व्यवसाय सुरू आहेत.पोलीस प्रशासनाची मदत घेवून अतिक्रमण निष्कासित करण्याची कार्यवाही करावी पुढच्या आठवड्यात आढावा घेणार असल्याचे मंत्री विखे म्हणाले.

---

द•ख•ल

## श्रीरामपुरात पावन प्रज्ञा पुराण कथा व गायत्री यज्ञ सुरू



(छाया - संजय पगारे)

**श्रीरामपूर** : येथील गायत्री परिवार चॅरिटेबल ट्रस्ट व गायत्री शक्ती पिठाच्या वतीने पावन प्रज्ञा पुराण कथा आणि गायत्री यज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, दि.२१ मार्चपासून या कार्यक्रमास सुरूवात झाली. शनिवारी सकाळी ८ ते ९ कलश शोभा यात्रा झाली. ९ ते १२ यज्ञ संस्कार, सायं. ५ ते ७ पावन प्रज्ञा पुराण कथा व ७.३० वा. महाप्रसाद असे सलग २४ मार्चपर्यंत ४ दिवस कार्यक्रम सुरू आहेत. कथेचे प्रवक्ता सुरतसिंग अमृते व त्यांच्या अनुयायी शिष्य (हरिद्वार) यांच्या मधूर वाणीतून कथा होत आहे. शनिवार दि.२१ रोजी कलशयात्रा गायत्री शक्तीपीठ, काळा राममंदिर मार्गे, थत्ते ग्राऊंड येथे येवून पुर्णाहूती झाली. ही कलशयात्रा उत्साहात पार पडली. या कार्यक्रमाचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन गायत्री चॅरिटेबल ट्रस्टचे कांतिलाल भिमजीभाई पटेल, तसेच सर्व विश्वस्त, गुजराती समाज, गायत्री मंडळ, युवती-युवक मंडळ यांनी केले आहे.

## २६ मार्चपासून रामनवमी उत्सवाला उत्साहात सुरुवात



**श्रीरामपूर** : शहरात गुरुवार, दि. २६ मार्च २०२६ पासून रामनवमी उत्सवाला उत्साहात सुरुवात होत आहे. यानिमित्त श्रीराम मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. गेली ९६ वर्षे हा उत्सव पारंपरिक पद्धतीने साजरा केला जात आहे. गुरुवारी दुपारी १२ वाजता श्री रामजन्म सोहळा होणार असून विविध मंडळांच्या झेंडा मिरवणुका शहरातून काढण्यात येणार आहेत. सायंकाळी भगवान श्रीरामांची रथयात्रा मेनरोड व शिवाजी रोड मार्गे निघेल. कॅनॉल परिसरात शोभेच्या दारूकामाचे आयोजन आहे. शुक्रवारी शनि महाराजांच्या प्रतिमेची रथयात्रा, तर शनिवारी भव्य कुस्ती स्पर्धा होणार आहेत. मानाच्या कुस्तीसाठी सुवर्णपदक देण्यात येणार आहे. यात्रेनिमित्त विविध मनोरंजनाची साधने, दुकाने व आकर्षणे दाखल होत आहेत. तसेच ८० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात येणार आहे. नागरिकांनी कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन यात्रा समितीने केले आहे.

## हनुमान जन्मोत्सवानिमित्त त्रिदिनात्मक सोहळा




**नेवासा** : हनुमान जन्मोत्सवानिमित्त तीर्थक्षेत्र नेवासा बुद्रुक येथील श्री समर्थ रामदास स्वामींनी स्थापित केलेल्या जागृत दक्षिणमुखी मारुती मंदिरात त्रिदिनात्मक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा मंगळवार, दि. ३१ मार्च ते गुरुवार, दि. २ एप्रिलदरम्यान होणार असल्याची माहिती देवस्थानचे अध्यक्ष गंगाधर शिंदे पाटील यांनी दिली. सोहळ्यात दररोज पहाटे काकडा भजन, विष्णुसहस्त्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण, सायंकाळी हरिपाठ, प्रवचन व रात्री हरिजागर असे धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. हे कार्यक्रम हभप कोंडीराम महाराज पेचे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडतील. गुरुवारी दि. २ एप्रिल रोजी पहाटे ६ वाजता पुष्पवृष्टीसह श्री हनुमंत जन्मोत्सव साजरा होणार आहे. सकाळी काल्याच्या कीर्तनाने सोहळ्याची सांगता होईल. पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

---

# सीए उत्तीर्ण प्राजक्ताचा अमरनाथ ग्रुपच्या वतीने सत्कार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या अमरनाथ ग्रुपच्या वतीने सीए परीक्षेत यश संपादन केलेल्या प्राजक्ता काकडे हिचा सत्कार समारंभात गौरव करण्यात आला. त्या जेष्ठ विधी तज्ञ स्वर्गीय गोरक्षनाथ काकडे यांच्या कन्या आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रुपचे मार्गदर्शक व नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील होते. यावेळी प्राजक्ता काकडे हिचा आई मीनाक्षी काकडे यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. जिद्द, चिकाटी आणि कुटुंबीयांच्या मार्गदर्शनामुळे हे यश मिळाल्याचे प्राजक्ता हिने सांगितले. त्रिंबकराव गायकवाड यांनी ग्रुपच्या



उपक्रमांची माहिती दिली. बालेंद्र पोतदार, किशोर गारुळे, शशिकांत नळकांडे आदींनी मनोगत व्यक्त करत शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर व ग्रुप सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्राजक्ता काकडे हीचा सन्मान आई मीनाक्षी काकडे यांच्या उपस्थितीत अमरनाथ ग्रुपच्या सदस्यांच्या हस्ते करण्यात आला. वडिलांनी पाहिलेले स्वप्न मनात बाळगून मी जिद्द व चिकाटीने अध्ययन केले, मातोश्री व बहिणी कडून मिळालेल्या मार्गदर्शन व प्रेरणेमुळे मी हे यश संपादन करू शकले असे प्राजक्ताने सांगीतले. सूत्रसंचालन सुधीर चव्हाण यांनी केले तर आभार रामनाथ जाधव यांनी मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

---

# दिव्यांग बांधवांच्या मदतीसाठी सेवा हाच धर्म

## कोल्हे परिवार कायम तत्पर : रेणुका कोल्हे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळवून देत त्यांच्या जीवनासाठी आवश्यक साधनसुविधा उपलब्ध करून देण्याचा संकल्प संजीवनी युवा प्रतिष्ठानने केला असून दिव्यांग बांधवांच्या मदतीसाठी कोल्हे परिवार कायम तत्पर असल्याचे प्रतिपादन संजीवनी महिला बचत गटाच्या अध्यक्षा रेणुकाताई विवेकभैय्या कोल्हे यांनी केले. संजीवनी युवा प्रतिष्ठान व पुणे येथील साधू वासवानी ग्रुपच्या संयुक्त विद्यमाने सहकार महर्षी, माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांच्या जयंतीनिमित्त प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. यावेळी अपघात किंवा अन्य कारणांनी नैसर्गिक अवयव गमावलेल्या दिव्यांगांना मोफत कृत्रिम अवयव, साहित्य व प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला नगराध्यक्ष पराग संधान, उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर, नारायणशेठ अग्रवाल, नगरसेवक आकाश वाजे, संतोष गंगवाल आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते. रेणुकाताई





कोल्हे म्हणाल्या, सेवा हाच धर्म हा स्व. शंकरराव कोल्हे यांनी दिलेला मूलमंत्र अंगीकारून युवा नेते विवेकभैय्या कोल्हे समाजसेवेसाठी कार्यरत आहेत. त्यांच्या पुढाकाराने कोपरगाव मतदारसंघात दिव्यांगांसाठी कृत्रिम अवयव वाटपाचा उपक्रम सुरू करण्यात आला असून अधिकाधिक गरजूंनी याचा लाभ घ्यावा, असे त्यांनी आवाहन केले. संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून दिव्यांगांना प्रमाणपत्रे मिळवून देणे, त्यांच्या येण्या-जाण्याची व्यवस्था करणे तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. या उपक्रमातून केवळ कृत्रिम अवयव देणे नव्हे, तर कुटुंबांना आधार देण्याचे कार्य होत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

---

# नरेंद्राचार्य संप्रदाय भक्त गणांच्या शोभायात्रेचे स्वागत



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : हिंदू नववर्ष व गुढीपाडव्याच्या निमित्ताने जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज संप्रदायाच्या वतीने नेवासा शहरात भव्य शोभायात्रा उत्साहात काढण्यात आली. या शोभायात्रेत हजारो भक्तगण सहभागी झाले असून शहरातील चौकाचौकात तिचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. धर्म, संस्कृती आणि परंपरेचा संगम या शोभायात्रेत अनुभवायला मिळाला. भगव्या ध्वजांनी सजलेले वातावरण, पारंपरिक वेशभूषेतील युवक-युवती, कलशधारी महिला, ढोल-ताशांचा गजर, भजन-कीर्तन यामुळे वातावरण भक्तिमय झाले होते. गजानन महाराजांचा देखावा, राम पंचायत, संबळ-सरस्वती नृत्य तसेच मरणोत्तर देहदान जनजागृतीचे देखावे विशेष आकर्षण ठरले. कृषी उत्पन्न बाजार समिती येथून निघालेली शोभायात्रा बसस्थानक चौक, खोलेश्वर गणपती चौक, नगरपंचायत चौक, डॉ. हेडगेवार चौक मार्गे मोहिनीराज मंगल कार्यालयात संपन्न झाली.

---

# बेलापूरला उद्या विराट हिंदु संमेलन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बेलापूर** : अखंड हिंदु समाज संघटन आणि धर्मरक्षणार्थ अभियाना अंतर्गत उद्या मंगळवार दि. २४ रोजी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत सायंकाळी चार वाजता विराट हिंदु संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

याप्रसंगी धर्माचार्य ह.भ.प. गोविंद महाराज जाटदेवळेकर,विश्व हिंदु परिषदेचे केंद्रीय सहमंत्री शंकर गायकर प्रमुख वक्ते म्हणुन मार्गदर्शन करणार आहे. या कार्यक्रमात बेलापूर मंडलातील सर्व संत मंडळी प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

जे. टी. एस. विद्यालयाच्या प्रांगणात आयोजित या हिंदु मेळाव्याला धर्म रक्षणाचा संकल्प करण्यासाठी पंचक्रोशीतील मोठ्या संख्येने बांधवांनी सहकुटुंब उपस्थित रहावे, असे आवाहन आयोजक अखंड हिंदु समाज बेलापूर मंडलाच्या वतीने करण्यात आले आहे.

---

# दाढ बु येथे आदन मदन बाबा यात्रा उत्सव

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लोणी** : राहाता तालुक्यातील दाढ बुद्रुक येथे आदन-मदन बाबा यात्रा उत्सवाचे आयोजन २२ ते २४ एप्रिल २०२६ दरम्यान करण्यात आले आहे. ग्रामस्थांनी यात्रेसाठी जय्यत तयारी केली असून उत्सव श्रद्धापूर्वक व उत्साहात साजरा केला जाणार आहे. पाडव्याच्या शुभमुहूर्तावर डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते नारळ फोडून यात्रेची सुरुवात झाली. रविवार, २२ रोजी सायंकाळी संदल मिरवणूक, सोमवारी रात्री तकतराव मिरवणूक व मंगला बनसोडे करवडीकर व नितीन कुमार यांचा लोकनाट्य तमाशा होणार आहे. त्यानंतर पहाटे आतिषबाजीचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारी सकाळी हजाऱ्यांचा कार्यक्रम, सायंकाळी कुस्ती आखाडा व रात्री पूनम कुडाळकर यांचा ऑर्केस्ट्रा होणार आहे. यात्रेत सर्व धर्मीय भाविक मोठ्या संख्येने सहभागी होतात. शांतता व नियमांचे पालन करावे, असे आवाहन ग्रामस्थांनी केले असून विविध पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने नियोजन करण्यात आले आहे.

---

# उंबरे शाळा प्रकरणात केंद्रप्रमुखांवर गंभीर आरोप

## घरभाडे, निर्लेखन व सांस्कृतिक वादातून आली अनियमितता उघड

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : तालुक्यातील उंबरे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेशी संबंधित एक धक्कादायक प्रकरण समोर आले असून, देवळाली प्रवराच्या केंद्रप्रमुख नीलिमा गणपत गायकवाड यांच्यावर विविध प्रकारचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. प्रशासनाला चुकीची माहिती सादर करणे, शासकीय नियमांचे उल्लंघन करणे, आर्थिक अनियमितता करणे तसेच जिल्हा परिषदेची प्रतिमा मलिन करण्याचे प्रकार त्यांच्या कार्यकाळात झाल्याचे प्राथमिक चौकशीत निदर्शनास आले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी आनंद भंडारी विभागीय चौकशी करण्याचे आदेश पारीत केले आहे. याबाबत समजलेली माहिती अशी की,सदर प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे घरभाडे भत्ता प्रकरण. शासनाकडून घरभाडे भत्ता मिळविण्यासाठी गायकवाड यांनी एका व्यक्तीचे नाव घरमालक म्हणून सादर केले होते. मात्र ग्रामपंचायत नोंदवहीत त्या व्यक्तीच्या नावावर कोणतीही मालमत्ता नोंद नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

त्यामुळे खोटी माहिती सादर करून शासनाची दिशाभूल व फसवणूक केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.

### विभागिय चौकशीचे गौडबंगाल ?

राहुरी तालुक्यातील उंबरे निर्लेखन,शासनाची फसवणूक करुन घरभाडे भत्ता लाटणे,जानेवारी २०२३ मध्ये झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमातील निकालावरूनही मोठा वाद निर्माण झाला होता.प्रशासनाविरोधात सोशल मीडियावर व वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध करण्यात आले. विशेष म्हणजे, या कार्यक्रमासाठी नियुक्त इतर निरीक्षकांनी या वादापासून स्वतःला दूर ठेवत प्रशासनासमोर कोणतीही हरकत नसल्याचे स्पष्ट केले होते. तरीदेखील संबंधित केंद्रप्रमुखांकडून प्रशासनावर दबाव टाकण्याचा प्रयत्न झाला व त्यामुळे अनावश्यक वाद निर्माण होऊन जिल्हा परिषदेची प्रतिमा मलिन झाल्याचे नमूद करण्यात आले आदी प्रकरणाची दोषी आसल्याचे सिद्ध झाले आसतानाही बडतर्फे करण्यात का आले नाही.असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.राहुरी तालुक्यातील कोंढवड येथिल मुख्याध्यापक यांच्या विरोधात कोणतीही गंभिर तक्रार नसताना भास्कर बुलाखे उच्चशिक्षित शिक्षकाला निलंबित करण्यात आले.गायकवाड यांची प्रशासन विरोधीतील भुमिका, आर्थिक गैरव्यवहार, शासनाची फसवणूक करुन घर भाडे लाटले.आदी चौकशीत दोषी सापडली असतानाही केवळ सेवानिवृत्ती जवळ आल्याने जिल्हा परिषद मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी सहनभूती दाखवून विभागिय चौकशी लावली का? असा प्रश्न शिक्षक वर्गातून विचाराला जात आहे. शिक्षकांबाबतीत एकावर अन्याय तर दुसऱ्याला सहानभूती दाखविली जात आहे.

### चौकशी अहवाल वरीष्ठांकडे पाठविला : मोहिनीराज तुंबारे

उंबरे येथिल निर्लेखन व मुख्याध्यापक यांनी घरभाडे लाटल्याची आणि जानेवारी २०२३ मध्ये झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमातील निकालावरूनही मोठा वाद निर्माण झाला होता.त्याचा अहवाल तत्कालीन गटशिक्षणाधिकारी गोरक्षनाथ नजन यांनी पाठविलेला होता.जिल्हा शिक्षणाधिकारी यांनी सर्व अहवाल एकत्र केले आहेत.राहुरीच्या गटशिक्षणाधिकारी कार्यालया मार्फत उंबरे निर्लेखन प्रकरणाची चौकशी करुन अहवाल पाठविला.जिल्हा शिक्षणाधिकारी कार्यालयाने दोषआरोप भरले आहेत.दोषआरोप नुसार दोषी आढळल्याने विभागिय चौकशी वरीष्ठांनी लावली आहे.संबधित मुख्याध्यापक बाबत विभागिय स्तरावर निर्णय होईल.उंबरे येथिल निर्लेखनाची तक्रार नगरसेवक संतोष चोळके व जालिंदर अल्हाट यांनी तर घर भाडे लाटण्याची तक्रार यमुना भालेकर यांनी केलेली होती.

उंबरे येथिल निर्लेखनात प्रकरणात जिल्हा शिक्षणाधिकारी यांनी गांभिर्याने घेतले नाही.चौकशीत आर्थिक गैरव्यवहार, अनियमता, हातावर पैसे वापरणे,कागदपत्रांची फेरफार,अशा अनेक गोष्टीत तत्कालीन मुख्याध्यापक दोषी सापडला आहे. उंबरे येथे न राहता शासनाची फसवणूकक करुन घरभाडे लाटल्याचे उघड झाले त्याची तक्रार यमुना भालेराव यांनी केलेली असताना व अन्य एक दोन तक्रारीचे चौकशी अहवेल एकत्र करुन दोषारोप प्रकरण करुन त्याची विभागियस्तरावर चौकशी लावण्यात आली. जिल्हा शिक्षण विभाग किरकोळ तक्रारीवरुन अनेक जणांना निलंबित केले आहे.परंतू उंबरे प्रकरणात हात ओले झाल्याने तत्कालीन मुख्याध्यापकाची सेवानिवृत्तीस बाधा येवू नये म्हणून बडतर्फ किंवा निलंबित करण्याऐवजी विभागिय चौकशी लावून शिक्षण विभागाने दुटप्पी धोरण राबविले आहे.

**संतोष चोळके, नगरसेवक, देवळाली प्रवरा नगर पालिका,**
**जालिंदर आल्हाट, सामाजिक कार्यकर्ता**

याशिवाय, शासनाच्या परिपत्रकानुसार मुख्यालयी वास्तव्यासाठी ग्रामसभेचा ठराव बंधनकारक असताना तो सादर न करता केवळ मासिक सभेचा ठराव सादर करण्यात आला. या ठरावामधील माहिती व अधिकृत नोंदींमध्ये विसंगती आढळल्याने कागदपत्रांच्या विश्वसनीयतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या संदर्भात सामाजिक कार्यकर्त्या यमुना भालेकर यांनी तक्रार केली होती. दरम्यान, जानेवारी २०२३ मध्ये झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमातील निकालावरूनही मोठा वाद निर्माण झाला होता.

या स्पर्धेत प्रथम क्रमांकाबाबत आक्षेप घेण्यात आले आणि संबंधित प्रकरण प्रशासनाविरोधात सोशल मीडियावर व वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध करण्यात आले. विशेष म्हणजे, या कार्यक्रमासाठी नियुक्त इतर निरीक्षकांनी या वादापासून स्वतःला दूर ठेवत प्रशासनासमोर कोणतीही हरकत नसल्याचे स्पष्ट केले होते. तरीदेखील संबंधित केंद्रप्रमुखांकडून प्रशासनावर दबाव टाकण्याचा प्रयत्न झाला व त्यामुळे अनावश्यक वाद निर्माण होऊन जिल्हा परिषदेची प्रतिमा मलिन झाल्याचे नमूद करण्यात आले आहे.यासंदर्भातील अहवाल तत्कालीन गटशिक्षणाधिकारी गोरक्षनाथ नजन यांनी खुडसगाव ता.राहुरी येथिल पालकांच्या तक्रार अर्जावरुन व सामाजिक कार्यकर्त्या यमूना भालेकर यांच्या तक्रारीवर चौकशी करुन अहवाल पाठविला होता.

याशिवाय, सन २०२० मधील मोडकळीस आलेल्या सहा वर्गखोल्यांच्या निर्लेखन प्रक्रियेमध्येही गंभीर अनियमितता झाल्याचे उघड झाले आहे. शासनाने ठरवून दिलेल्या अटी व शर्तींचे पालन न करता पाडकाम करण्यात आले. संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत काम न होणे, पंचनाम्याचा अभाव, साहित्याची मोजदाद व नोंद न ठेवणे, तसेच अधिकृत स्वाक्षऱ्यांचा अभाव अशा अनेक त्रुटी आढळल्या आहेत. लिलाव प्रक्रिया देखील नियमबाह्य व अपारदर्शक पद्धतीने पार पडल्याचे दिसून आले आहे. जाहीर आवाहनपत्रावर दिनांक नसणे, निविदा नोंदी अपूर्ण असणे आणि शालेय व्यवस्थापन समितीचा ठराव नसणे या बाबी गंभीर मानल्या जात आहेत. उंबरे येथील निर्लेखन प्रकरणाची तक्रार देवळाली प्रवराचे नगरसेवक संतोष चोळके व सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार जालिंदर आल्हाट यांनी तक्रार केली होती.या प्रकरणाची चौकशी गटशिक्षणाधिकारी मोहनिराज तुंबारे व विस्तार अधिकारी जयश्री कार्ले यांनी करुन त्याचा अहवाल जिल्हा पृरिषद शिक्षण विभागाला पाठविला होता. विशेष म्हणजे, लिलावातून मिळालेली रक्कम रुपये ८५ हजार असल्याचे नमूद असताना त्यापैकी केवळ रुपये ३४ हजार ७५० इतकीच रक्कम शासनाच्या खात्यात जमा करण्यात आली.

उर्वरित रकमेबाबत कोणतेही स्पष्ट अभिलेख उपलब्ध नसल्याने आर्थिक गैरव्यवहाराचा संशय अधिक गडद झाला आहे. तसेच सादर कागदपत्रांतील दिनांकांमध्ये मोठ्या प्रमाणात विसंगती आढळून येत असल्याने कागदपत्रे नंतर तयार करण्यात आली असावीत, अशीही शक्यता व्यक्त केली जात आहे.या सर्व प्रकरणांमुळे महाराष्ट्र जिल्हा परिषदा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चे उल्लंघन झाल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. संबंधित प्रकरणाची गंभीरता लक्षात घेता पुढील प्रशासकीय कारवाई काय होणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## सुभाष त्रिभुवन यांचा 'कर्तव्यदक्ष समाजसेवक' पुरस्काराने सन्मान



**श्रीरामपूर** : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे जिल्हा कार्याध्यक्ष तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळा स्मारक समितीचे अध्यक्ष सुभाष त्रिभुवन यांना कर्तव्यदक्ष समाजसेवक' या पुरस्काराने सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. हा सन्मान मौलाना आझाद कॉलेज इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटचे मॅनेजर साहेबराव जाधव यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी सुभाष त्रिभुवन यांनी त्यांच्या पत्नी सुशीला त्रिभुवन यांना बरोबर घेऊन हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी माणिक जाधव, सुनील जाधव, अनिल जाधव आणि महेंद्र जाधव उपस्थित होते. सुभाष त्रिभुवन हे संभाजीनगरचे जावई असल्याचा आम्हाला अभिमान आहे. त्यांच्या हातून पुढेही असेच सामाजिक कार्य घडत राहो, अशा शुभेच्छा यावेळी देण्यात आल्या. कार्यक्रमास अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

## टाकळी भीमात रमजान ईद उत्साहात साजरी



**तळेगाव ढमढेरे** : टाकळी भीमा (ता. शिरुर) येथे रमजान ईद निमित्त सामुहिक नमाज पठन करत एकमेकांना शुभेच्छा देत मोठ्या उत्साहात मुस्लिम धर्मियांचा पवित्र रमजान ईद सण साजरा करण्यात आहे. टाकळी भीमा (ता. शिरुर) येथे रमजान ईद निमित्ताने गावातील मस्जिदमध्ये सर्व मुस्लीम बांधवांनी मौलाना गुलजार अन्सारी यांच्या नेतृत्वाखाली सामुहिक नमाज पठण करत देशात शांतता प्रस्तापित करण्याची प्रार्थना केली, मुस्लिम समाजाचे अध्यक्ष अशपाक मोमीन, अमीरभाई शेख, शाहरुख मुलाणी, जावेदभाई शेख, अमजद मुलाणी यांसह आदी उपस्थित होते, तर नमाज पठण नंतर ग्रामस्थांनी सर्व मुस्लीम बांधवांना शुभेच्छा दिल्या, यावेळी पोलीस पाटील प्रकाश करपे, विश्वव्याख्याते आकाश वडघुले, श्रीराम तरुण मंडळाचे अध्यक्ष विशाल पाटोळे, पोलीस हवालदार सचिन भागवत यांसह आदी उपस्थित होते, दरम्यान अशपाक मुलाणी यांनी सर्वांचे आभार मानले.

## शिरदाळे येथील पंचांग वाचण्याची शेकडो वर्षांची परंपरा कायम

**लोणी धामणी** : शिरदाळे (ता.आंबेगाव ) येथे गेली शेकडो वर्षांपासून गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर अर्थात मराठी नववर्षाच्या पहिल्या दिवशी पंचांग वाचन केले जाते.ही गेली शेकडो वर्षांची परंपरा असून संपूर्ण वर्षभराचे नियोजन शेतकरी या आधारावर करत असतात.यात चालू वर्षाचे पर्जन्यमान,हवामान याचा अंदाज वर्तवला जातो. सकाळी गुढी उभारल्यानंतर गावातील ग्रामस्थ शिरदाळे महादेव मंदिर परिसरात जमतात.त्याठिकाणी पंचांगाचे पूजन केले जाते.

वर्षफल (भविष्यफल):- यात देशाची स्थिती,पर्जन्यमान,आरोग्यविषयक अंदाज,राजकीय परिस्थिती यावर भाष्य केलेले असते.तसेच वर्षभरातील सण,वार सुवर्ण खरेदीचे मुहूर्त,साडेतीन मुहूर्त कधी आहेत याचे देखील वाचन केले जाते. नवीन वर्षाच्या पूर्वसंधेला गावातील अनेक ग्रामस्थ,जेष्ठ मंडळी,तरुण मंडळी हे संवत्सर फल आवर्जून ऐकण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यातून शेतकरी बांधवांना संपूर्ण पावसाचा अंदाज दिला जातो.

तसेच ते आपल्या शेतीचे नियोजन देखील याच आधारावर करत असतात.त्यामुळे ग्रामीण भागात या परंपरेला अनन्यसाधारण महत्व आहे.शेवटच्या टप्प्यात सर्वांना ज्वारीचे दाणे वाटप केले जातात ऑगस्ट महिन्याच्या सुरवातीला पाऊस कमी असून उत्तरार्धात मात्र त्याची भरपाई होईल असे पंचांग वाचक श्री.संजय तांबे यांनी सांगितले आहे.यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

## खळी येथे रमजान निमित्त फराळ साहित्याचे वाटप

**झरेकाठी** : पवित्र रमजान महिन्यानिमित्त खळी येथे मुस्लिम बांधवांसाठी फराळ साहित्याचे वाटप करण्यात आले. राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. रमजानच्या उपवासाच्या काळात मुस्लिम बांधवांना मदत व्हावी या उद्देशाने साहित्य पाठविण्यात आले होते. यावेळी जनसेवा युवकचे गाव प्रमुख सुरेश नागरे, प्रा. रमेश सानप, सरपंच विलास वाघमारे, गोरक्षनाथ घुगे, हौशीराम नागरे, ज्ञानदेव लबडे, सचिन आव्हाड, माजी सरपंच भाऊसाहेब घुगे आदी मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

या उपक्रमामुळे परिसरात सामाजिक सलोख्याचे दर्शन घडले असून मुस्लिम बांधवांनी समाधान व्यक्त केले. तसेच रमजान ईदनिमित्त विखे कुटुंबियांच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या.

# डाकले महाविद्यालयात दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : येथील चंद्ररूप डाकले जैन वाणिज्य महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अर्थसहाय्यीत गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत दोन दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्र उत्साहात संपन्न झाले. या चर्चासत्राचा विषय, 'ब्लॉकचेन, एआय व आयसीटीद्वारे डिजिटल वाणिज्याचे पुनर्निर्माण' असा होता. प्राचार्य डॉ. संजय कांबळे यांनी प्रास्ताविक करताना डिजिटल तंत्रज्ञानामुळे वाणिज्य क्षेत्रात होत असलेल्या आमूलाग्र बदलांचा आढावा घेतला.



कृत्रिम बुद्धिमत्ता, ब्लॉकचेन आणि माहिती - तंत्रज्ञान यांच्या एकत्रित वापरामुळे व्यवसाय प्रक्रिया अधिक पारदर्शक व कार्यक्षम होत असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्था मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई जगधने यांनी नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करून कौशल्य विकासावर भर द्यावा असे मत व्यक्त केले. प्रमुख पाहुणे डॉ. विजय ककडे (प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) यांनी जागतिक अर्थव्यवस्थेतील डिजिटल क्रांतीचे परिणाम स्पष्ट करताना, ब्लॉकचेन तंत्रज्ञानामुळे व्यवहारातील विश्वासार्हता वाढत असल्याचे सांगितले. यावेळी प्राचार्य डॉ. प्रवीण बडधे उपस्थित होते. पहिल्या सत्रात डॉ. अरुण मराठे (विद्या प्रबोधिनी कॉलेज, पर्वरी, गोवा) यांनी ए.आय आणि ब्लॉकचेनच्या सहाय्याने डिजिटल व्यवहार अधिक सुरक्षित कसे करता येतील, यावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात डॉ. मनोजकुमार लंगोटे (मोंजे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, नाशिक) यांनी ई-कॉमर्समधील आयसीटीची भूमिका स्पष्ट केली. तिसऱ्या सत्रात डॉ. रुपेश शुक्ला (प्राचार्य, व्ही. ए. कॉमर्स कॉलेज, इंदोर) यांनी डिजिटल व्यवहारांतील आव्हाने व संधी यावर भाष्य केले.

चौथ्या सत्रात सीए डॉ. परेश बोरा (अहमदनगर कॉलेज, अहिल्यानगर) यांनी ब्लॉकचेनच्या आर्थिक व्यवहारांवरील प्रभावाचे विश्लेषण केले. समारोप सत्रात डॉ. अरुण गायकवाड (प्राचार्य, मालपाणी महाविद्यालय, संगमनेर) यांनी परिसंवादाचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. डॉ. पौर्णिमा गुजर यांनी आभार प्रा. डॉ. विजय नागपुरे यांनी मानले.

## निधन वार्ता

### सौ.मीराबाई चक्रनारायण



**नेवासा** : शहरातील संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर रस्त्यावर राहणाऱ्या सेवेकरी सौ. मीराबाई दत्तात्रय चक्रनारायण (वय ५५) यांचे हृदय विकाराच्या झटक्याने निधन झाले. यांच्या पश्चात पती,दोन मुली, एक मुलगा,नातवंडे असा परिवार आहे. रविवारी श्री क्षेत्र बहिरवाडी येथे आमटी भाकरी प्रसाद उपक्रमात त्या भाकरी बनवत असतांना तेथेच त्यांचे हदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रय चक्रनारायण यांच्या त्या पत्नी होत्या. तर युवा कार्यकर्ते मनोज चक्रनारायण यांच्या त्या मातोश्री होत्या.

### ग.भा.तोलाबाई आसने



**माळवाडगांव** : येथील जुन्या पिढीतील धार्मिक विचाराच्या ग.भा.तोलाबाई बाबुराव आसने (वय ९५) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. गोकुळ व सुभाष आसने यांच्या मातोश्री होत. तसेच बबन आसने, भाजपचे सोशल मीडिया संयोजक, पत्रकार संदीप आसने व माळवाडगांव सोसायटीचे सचिव प्रदीप आसने यांच्या त्या आजी होत.

## श्रीराम जन्मोत्सव सोहळ्यात स्वरमाधुरी कार्यक्रमाला भाविकांचा प्रतिसाद




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : येथे श्रीराम जन्मोत्सवाच्या निमित्ताने येथील श्रीराम मंदिरात स्वरमाधुरीगायन ग्रुपच्या वतीने आयोजित भक्ती गीतांच्या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मुख्य गायिका माधुरीताई कुलकर्णी यांनी आपल्या सह गायिकांच्या साथीने प्रभू रामचंद्राचे भक्तीगीते गाऊन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. यावेळी झालेल्या भक्ती संगीत कार्यक्रम प्रसंगी मुख्य गायिका सौ.माधुरीताई कुलकर्णी यांनी प्रभू रामचंद्रांची गाजलेली भक्तीगीते सादर केली त्यांच्या या गीतांना ग्रुपच्या सह गायिकांसह नेवासा येथील.

हनुमान भजनी मंडळाचे ज्ञानेश्वर काळे (संवादिनी),सुरेगाव येथील सुनील शिंदे (तबला)यांनी उत्कृष्ट संगीत साथ दिली. यावेळी मुख्य गायिका माधुरीताई कुलकर्णी, नितीन कुलकर्णी, शिक्षक दत्तात्रय शिंदे यांच्यासह उपस्थित संगीतसाथ देणाऱ्यांचा यावेळी श्रीराम मंदिर देवस्थानच्या वतीने अशोक डहाळे व अंकुश लवडकर यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. श्रीराम जन्मोत्सवाचे औचित्य साधून मोफत सेवा देणाऱ्या स्वरमाधुरी गायन ग्रुपचे यावेळी उपस्थित भाविकांनी कौतुक करत त्यांना धन्यवाद दिले.

# मानाची गुढी, मानाची पैठणी

## ग्रामसेवक गायकवाड ठरले भाग्यवान विजेते

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**गंगापूर** : गुढीपाडव्याच्या निमित्ताने आयोजित विशेष ऑफर अंतर्गत निशांत ई-बाईक शोरूम येथे भाग्यवान ग्राहकांना आकर्षक बक्षिसांची संधी देण्यात आली होती. या योजनेअंतर्गत काढण्यात आलेल्या सोडतीत ग्रामसेवक गायकवाड हे मानाच्या पैठणीचे भाग्यवान विजेते ठरले. काल आयोजित कार्यक्रमात बजाज फायनांस यांच्या वतीने गायकवाड यांना पारंपरिक पैठणी साडी भेट देण्यात आली. यावेळी बजाज फायनांसचे व्यवस्थापक अविनाश खरात, गौरव साळवे,निशांत ई बाईकचे गोपाल बन्सोड व शोरूममधील ग्राहक व नागरिकांची मोठी उपस्थिती होती. निशांत ई-बाईक शोरूमने गुढीपाडव्याच्या सणानिमित्त ग्राहकांसाठी विशेष योजना राबवून आकर्षक बक्षिसांची मेजवानी दिली. यामुळे ग्राहकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, अशा उपक्रमांमुळे ग्राहकांचा विश्वास अधिक दृढ होत असल्याचे शोरूम व्यवस्थापनाने सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी विजेत्यांचा सत्कार करण्यात आला तसेच भविष्यातही अशा योजना राबविण्याचा मानस व्यक्त करण्यात आला.

# जरा याद करो कुर्बानी............



**दी**डशे ते दोनशे वर्ष इंग्रजांच्या पारतंत्र्यात असणाऱ्या भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी हजारो स्वातंत्र्य सैनिकांनी स्वतःच्या जीवाचे बलिदान दिले. अनेक जण फासावर चढले तर कित्येकांनी इंग्रजांच्या गोळ्या छातीवर झेलल्या. या वीर स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानाने १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत माता इंग्रजांच्या गुलामीतूम मुक्त झाली. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी छातीवर गोळ्या झेलल्या तर अनेक स्वातंत्र्य सैनिक हसत हसत फासावर चढले. भगत सिंग, राजगुरू आणि सुखदेव हे स्वातंत्र्य सैनिक देखील भारत मातेला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी हसत हसत फासावर चढले आणि शहीद झाले. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्या जीवाची बाजी लावणारे स्वातंत्र्य सैनिक शहीद भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांना २३ मार्च १९३१ रोजी इंग्रजांनी फाशी दिली होती.

आज २३ मार्च हा दिवस शहीदांच्या नावे कोरला गेला गेला आहे. आजच्याच दिवशी म्हणजे २३ मार्च १९३१ रोजी शहीद भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वतःच्या प्राणाचे बलिदान दिले. ९५ वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी इंग्रजांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी दिली होती. देशासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या शहिदांना आदरांजली वाहण्यासाठी आजचा दिवस संपूर्ण देशात शहीद दिवस म्हणून साजरा केला जातो. १९२८ मध्ये सायमन कमिशन नावाचे शिष्टमंडळ भारतात आले होते. या कमिशनला विरोध म्हणून लाला लजपतराय यांनी मोठा मोर्चा काढला होता. सायमन कमिशनला विरोध करणाऱ्या लाला लजपतराय यांच्यावर इंग्रजांनी लाठीहल्ला केला. या लाठी हल्ल्यात लाला लजपतराय गंभीर जखमी झाले त्यातच त्यांचा मृत्यू झाला. लाला लजपतराय यांच्या मृत्यूनंतर संपूर्ण देशात इंग्रजांविरुद्ध संतापाची लाट उसळली. लाला लजपतराय यांच्या मृत्युनंतर देशातील जहाल गटाचे स्वातंत्र्य सैनिक कमालीचे चिडले. चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, राजगुरु, सुखदेव आणि अन्य जहाल क्रांतिकारकांनी लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्याची शपथ घेतली. लाला लजपतराय यांच्या मृत्यूच्या एक महिन्याच्या आतच या क्रांतिकारकांनी आपली शपथ पूर्ण केली आणि १७ डिसेंबर १९२८ रोजी ब्रिटिश अधिकारी सँडर्सला गोळ्या घालून ठार केले. काही काळ ते भूमिगत राहिले मात्र फितुरीमुळे ते पोलिसांच्या हाती लागले.

७ ऑक्टोबर १९३० रोजी इंग्लिश कोर्टाने भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशीची शिक्षा सुनावली. यानंतर भगतसिंग यांची शिक्षा कमी व्हावी यासाठी फेर याचिका दाखल करण्यात आली मात्र १० मार्च १९३१ रोजी ती याचिका कोर्टाने फेटाळली. २३ मार्च हा दिवस भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांच्या फाशीसाठी निश्चित करण्यात आला. २३ मार्च १९३१ रोजी सकाळी ७ वाजून ३३ मिनिटांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी देण्यात आली. फाशीच्या वेळी या तिघांनी मेरा रंग दे बसंती चोला ...... हे गाणे गायले. फासावर लटकतानाही भारत मातेच्या या सुपुत्रांच्या चेहऱ्यावर कसल्याही प्रकारचे दुःख किंवा पश्चाताप नव्हता उलट भारत मातेसाठी फासावर जात असल्याचा अभिमान होता. आजच्या दिवशी भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतूम मुक्त करण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या क्रांतिकारकांच्या बलिदानाचे स्मरण करणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या असंख्य ज्ञात अज्ञात शहिदांना शहिद दिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार,**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## खंडाळ्याची यात्रा जागेअभावी रस्त्यावर थाटली दुकाने अन् पाळणे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर तालुक्यातील खंडाळा येथे ग्रामदैवत श्री म्हसोबा महाराज या देवस्थानला यात्रेसाठी जागा नसल्यामुळे मंदीर मार्गावरील रस्त्यालगतच सर्व दुकाने थाटली गेली होती. यानिमित या ठिकाणी कुस्त्यांचा जंगी हंगाम्यात कुस्त्या चांगल्याच रंगल्या. यात्रेकरूंची गर्दी मात्र मोठ्या प्रमाणात होती.पहिल्या दिवशी वादळी पावसामुळे अक्षरशः सर्व व्यावसायिकांची धांदल उडाली. यात्रेच्या दिवशी सकाळी सूर्योदयाबरोबरच कावडीने आणलेल्या पाण्याची मिरवणूक गुलालाची उधळण फटाक्याची आतिषबाजी यासह सवाद्य पार पडली.

त्यानंतर म्हसोबा मूर्तीचाअभिषेक व महापूजा पोलीस उपनिरीक्षक श्री निकम यांचे हस्ते करण्यात आली. रात्री हनुमान मंदिराच्या प्रांगणात फटाक्याची आतिषबाजी, सकाळी कलाकारांच्या हजेऱ्या, घोडा बैल शर्यत,कुस्त्यांचा हगामा या वअनेक धार्मिक कार्यक्रमाबरोबर मनोरंजनाच्या कार्यक्रमात आर्केस्ट्राचे आयोजन करण्यात आले होते. संध्याकाळी भाविकांची गर्दी असतांना काठ्यांची मिरवणूक यापुढे बंद करणार असल्याचा निर्णय यात्रा समितीने घेतला आहे. ज्या मंडळांना काठीची मिरवणूक काढायची असेल त्यांनी दुपारी तीन वाजेपर्यंत आपल्या मिरवणुका संपवून मागे फिरायचे आहे.

त्यानंतर यात्रेकरू भाविकांची गर्दी सुरू होते त्या कालावधीमध्ये कोणत्याही मंडळाची काठी यात्रेमध्ये येणार नाही यासाठी काळजी घेण्यात येणार आहे.परिसरातील व स्थानिक भाविकांनी यात्रेमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यानिमित या ठिकाणी कुस्त्यांचा जंगी हंगाम्यात कुस्त्या चांगल्याच रंगल्या. यामध्ये अनेक मल्लांनी भाग घेतला होता.यात्रा यशस्वी पार पाडण्यासाठी ग्रामस्थ व यात्रा समितीने परिश्रम घेतले.


## नशिबाची परिक्षा

सोमवार दि. २३ मार्च २०२६

**मिलनम डे**
उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत

१५६ १२६
२४६ **२-९** ४५०
६६० ९००

जोड
२१-३९-७४-५८-९०

**कल्याण**
उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत

१३० १२९
५९० **४-२** ४८०
७७० २२८

जोड
४०-६२-५३-७१-२९

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत

१४५ १२०
३७० ६७०
४०० ५८०

जोड
०७-४३-२१-९८-३५

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६


# गंगापूर शहर व तालुक्यात रमजान ईद उल फीतर उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**गंगापूर** : शहर व तालुक्यात रमजान ईद (ईद-उल-फितर) मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या पवित्र सणानिमित्त विविध ईदगाह व मशिदींमध्ये मुस्लिम बांधवांनी मोठ्या संख्येने एकत्र येत नमाज अदा केली. दारुसलाम मस्जिद, त्रिकोणी चौक येथे सकाळी ८.०० वाजता मौलाना चाँद पाशा यांनी नमाज पठण केली मस्जिद नसीम नजीर ८:३० नमाज पठण जुनी ईदगाह येथे ८.३० वाजता मौलाना युसुफ मौलवी यांनी नमाज अदा केली. नवीन ईदगाह येथे सकाळी ९.०० वाजता मौलाना मुबीन शेख (तब्लिग जमात अमीर) यांनी नमाज पठण पडली. तसेच जामा मस्जिद, गंगापूर येथे ९.३० वाजता मौलाना आसिफ पटेल यांनी नमाज पठण केली. यावेळी प्रशासनातील नायब तहसीलदार सचिन वाघमारे, पोलिस निरीक्षक कुमारसिंग राठोड, नगराध्यक्ष संजय जाधव, उपनगराध्यक्ष अमोल जगताप यांच्यासह विविध पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते. त्यांनी मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी शहरातील अनेक सामाजिक, राजकीय व धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून नमाज अदा केली. तसेच गंगापूर पोलिसांकडून ठिकठिकाणी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

एकूणच, गंगापूर शहर व तालुक्यात रमजान ईद शांतता, उत्साह आणि धार्मिक वातावरणात साजरी करण्यात आली. याप्रसंगी गंगापूर शहरातील जमीत अमिर मौलाना मुबीन साहब , माजी नगरध्यक्ष फैसल चाऊस, नगरध्यक्ष मोहासीन चाऊस, माजी उपध्यक्ष खालेद नाहदी,पत्रकार अलिम चाऊस, जफर खान, सय्यद यूसुफ, नगरसेवक सय्यद अख्तार,शेख बुहान फिटर,नईम मन्सुरी,नदीम बागवान, लाला शेख, अनिस कुरैशी,बदर जहुरी,रिजवान पठाण, यांनी नमाज अदा केली.


## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 460 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |

※ वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये ※

## द • ख • ल

### पशुपक्षी प्रदर्शनाथ उत्कृष्ट बैल जोडीत ठाकूर निमगावचे विजय कातकडे प्रथम




**शेवगाव** : पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती शेवगाव यांच्या मार्गदर्शनाखाली आदर्श गाव वाघोली येथे तालुकास्तरीय पशुपक्षी प्रदर्शन २०२६ मोठ्या उत्साहात पार पडले. या प्रदर्शनाचे उद्घाटन आमदार मोनिका राजळे यांच्या हस्ते करण्यात आले.

स्पर्धेत उत्कृष्ट बैल जोडी या गटात ठाकूर निम गाव येथील विजय बलभीम कातकडे यांनी प्रथम क्रमांक पटकावून आपला ठसा उमटवला. त्यांच्या बैलजोडीच्या बांधणी, ताकद व देखभालीचे सर्वांनी कौतुक केले. कार्यक्रमास पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी, पंचायत समितीचे पदाधिकारी, तसेच मोठ्या संख्येने शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते. या प्रदर्शनामुळे पशुपालन व्यवसायाला चालना मिळून शेतकऱ्यांना नव्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वास यावेळी ठाकूर निमगाव सामाजिक कार्यकर्ते संभाजी कातकडे यांनी व्यक्त केला.

### बोल्हेगाव येथील मदिना मस्जिदमध्ये रमजान ईदची नमाज अदा



**अहिल्यानगर** : बोल्हेगाव उपनगरातील गांधीनगर येथील मदिना मस्जिदमध्ये रमजान ईदची विशेष नमाज अदा करण्यात आली. यावेळी भारताच्या प्रगतीसाठी तसेच देशात अमन व शांतता नांदावी यासाठी प्रार्थना करण्यात आली. रमजान महिना हा प्रेम, बंधुभाव आणि एकतेचा संदेश देणारा पवित्र महिना आहे. या महिन्यात मुस्लिम समाज महिनाभर रोजे (उपवास) ठेवून शेवटच्या दिवशी ईद-उल-फित्र, म्हणजेच रमजान ईद मोठ्या उत्साहात साजरी करतो. ईद-उल-फित्रच्या दिवशी गांधीनगरच्या मस्जिदमध्ये नमाज अदा करून देशाच्या प्रगतीसाठी, तसेच देशात शांतता आणि सौहार्द टिकून राहावे यासाठी अल्लाहकडे विशेष दुआ करण्यात आली. या नमाजमध्ये परिसरातील हजारो मुस्लिम बांधव सहभागी झाले होते. या प्रसंगी नगर जिल्ह्यात जातीभेद विसरून सर्व समाजाने एकोप्याने राहावे, यासाठी देखील प्रार्थना करण्यात आली. नमाजनंतर उपस्थितांनी एकमेकांना ईद मुबारकच्या शुभेच्छा देत बंधुभाव आणि ऐक्याचा संदेश दिला. यावेळी मौलाना इर्शाद रझवी आलम यांनी सामुदायिक नमाज पठण करुन एकात्मतेचा संदेश दिला. तसेच मदिना मस्जिदचे अध्यक्ष नुरमहंमद शेख, चांद शेख, रज्जाक शेख, महेबूब शेख, लतीफ बेग, अजीजखा पठाण, जब्बार शेख, युनुस बेग,दिलावर शेख, आयुब शेख, राजू शेख, मुख्तार शेख, इस्राईल पठाण, फारुख पठाण, फिरोज शेख, रिजवान शेख तसेच मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### १० वर्षीय सुलतान शोहेब जहागीरदारचे महिनाभर उपवास पूर्ण



**अहिल्यानगर** : पवित्र रमजान महिन्याच्या आध्यात्मिक वातावरणात केवळ १० वर्षांच्या सुलतान शोहेब जहागीरदार या चिमुकल्याने पूर्ण ३० रोजे (उपवास) यशस्वीरीत्या पूर्ण करत एक प्रेरणादायी उदाहरण घालून दिले आहे. एवढ्या लहान वयात दाखविलेली चिकाटी, श्रद्धा आणि संयम यामुळे बेलदार गल्ली व तेलीखूंट परिसरात त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

रमजान हा केवळ उपवासाचा नव्हे, तर आत्मशुद्धी, संयम, त्याग आणि मानवतेचा संदेश देणारा महिना मानला जातो. सुलतानने दिवसभर उपाशी राहूनही नमाज अदा करणे, कुरआन पठण आणि इतर धार्मिक कर्तव्ये प्रामाणिकपणे पार पाडत या मूल्यांचे पालन केले. त्याच्या या प्रयत्नांमुळे केवळ कुटुंबीयच नव्हे, तर परिसरातील नागरिकही भावूक झाले आहेत. सुलतानच्या या यशामागे त्याच्या कुटुंबीयांचा मोठा आधार असून तो सामाजिक कार्यकर्ते साहेबानं जहागीरदार यांचा भाचा आणि पप्पू जहागीरदार यांचा नातू आहे. जहागीरदार परिवाराकडून मिळालेले योग्य म ार्गदर्शन, प्रोत्साहन आणि धार्मिक संस्कार यामुळेच सुलतानने हे कठीण वाटणारे उद्दिष्ट सहज पूर्ण केले.

### बालविवाह मुक्त भारत अभियानाद्वारे जनजागृती

**अहिल्यानगर** : भारत सरकारच्या महिला व बाल विकास मंत्रालय यांच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'बालविवाहमुक्त भारत' अभियानची जनजागृती मोहीम अहिल्यानगर महिला व बालविकास कार्यालय यांच्या मार्गदर्शनाखाली नगर जिल्ह्यामध्ये उस्फुर्तपणे राबविण्यात आली. बालविवाह ही सम ाजाला लागलेली घातक कीड आहे.अहिल्यानगर जिल्ह्यात २३ हजार ५०० हून अधिक प्रतिज्ञापत्र / शपथपत्र जिल्हा परिषद शाळा, हायस्कूल, कॉलेज, चर्च, मंदिर, बचतगट, ग्रामपंचायत, स्वयंसेवी संस्था, कार्यालये, रात्रशाळा, धार्मिक कार्यक्रम अशा ठिकाणी सामूहिक शपथविधी घेण्यात आले. यामध्ये विद्यार्थी, पालक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीगोंद्यात धक्कादायक प्रकार उघड

# अल्पवयीन मुलीसोबत संबंध; दीड महिन्यांची गरोदर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा** : श्रीगोंदा तालुक्यातील एका मळ्यात एक अत्यंत गंभीर आणि संतापजनक घटना उघडकीस आली असून, अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे मात्र आरोपी फरार झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, श्रीगोंदा शहरणजीक एक मळ्यात राहणाऱ्या एक १६ वर्षे १७ दिवस वयाच्या अल्पवयीन मुलीवर तिच्याच पतीने वारंवार जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवल्याचा आरोप आहे.

विशेष म्हणजे, मुलगी अल्पवयीन असल्याची पूर्ण कल्पना असतानाही आरोपीने हे कृत्य केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.या प्रकारामुळे पीडिता सध्या दीड महिन्यांची गरोदर असल्याचे समोर आले असून, हा प्रकार ६ डिसेंबर २०२५ ते ११ मार्च २०२६ दरम्यान घडल्याचे स्पष्ट झाले आहे.या प्रकरणी धिरज कांतीलाल लोखंडे (वय २५) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांसह बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा आणि बालविवाह प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक गणेश अहिरे हे करत असून आरोपी फरार झाला आहे या घटनेमुळे श्रीगोंदा परिसरात खळबळ उडाली असून, नागरिकांकडून आरोपीवर तातडीने अटक आणि कठोर कारवाईची मागणी होत आहे.

**बालविवाह रोखण्यात प्रशासन अपयशी?**
**या प्रकरणाने केली यंत्रणेची पोलखोल**

श्रीगोंदा तालुक्यात उघडकीस आलेल्या अल्पवयीन मुलीवरील अत्याचाराच्या प्रकरणामुळे एकच प्रश्न सरळ उभा राहतो बालविवाह रोखण्याची जबाबदारी असलेले प्रशासन नेमके कुठे होते?बालविवाह रोखण्यात प्रशासन अपयशी? या प्रकरणाने उघडली यंत्रणेची पोलखोल केली आहे

**कायदा म्हणतो काय?**

अल्पवयीन मुलीसोबत तिच्या इच्छेविरुद्ध किंवा अगदी 'संमती' असली तरीही संबंध ठेवणे हा गंभीर गुन्हा मानला जातो. अशा प्रकरणांत कायदा अत्यंत कठोर असून आरोपीला कठोर शिक्षा होऊ शकते.

## जागतिक ग्राहक दिन घेण्यासाठी तहसील प्रशासनाला

# वेळ नसल्यामुळे संघटनेचे पदाधिकारी आक्रमक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** : दरवर्षीप्रमाणे २४ डिसेंबर हा राष्ट्रीय ग्राहक दिन व १५ मार्च हा जागतिक ग्राहक दिन महाराष्ट्र शासनाच्या अन्न व पुरवठा विभागाकडून आलेल्या आदेशानुसार जिल्हा पुरवठा अधिकारी व जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व तालुक्यांमधून साजरा करण्यात येतो. मात्र श्रीगोंदा तालुक्यात १५ मार्च नंतर आठ दिवसांचा कालावधी उलटल्यानंतरही श्रीगोंदा तहसीलदार व पुरवठा अधिकारी यांच्या गलथान,बेफिकीर व मनमानी कारभारामुळे व गॅस टंचाईचा बागुलबुवा उभा करत श्रीगोंद्याचे पुरवठा अधिकारी ज्ञानेश्वर कोरे ग्राहक पंचायतीच्या श्रीगोंदा तालुकाध्यक्ष अनंता पवार यांना १५ मार्च रविवार असल्यामुळे सुट्टीच्या दिवशी का ग्राहक दिन घेणारडअसा उलट सवाल करत आहेत. वेळ मिळाल्यानंतर तारीख कळवू असे सांगत, आपली जबाबदारी झटकली आहे.

याबाबत पत्रकारांशी बोलताना अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हा सहसचिव जितेंद्र पितळे म्हणाले की, आम्ही वीस ते बावीस वर्षांपासून श्रीगोंदा तालुक्यासह जिल्ह्यात सर्व आधिकाऱ्यांना व शासकीय कार्यालयांना वेळोवेळी सांगितल्यानंतरही कोणताही अधिकारी ग्राहक दिनाला उपस्थित राहत नाही. शासनाचा आदेश आला म्हणून थातूरमातूर पद्धतीने व कोणतेही शासनाचे आदेश न पाळता सात-सात हजार रुपयांच्या अनुदानात भ्रष्टाचार करुन एक वर्षात दोन ग्राहक दिनांना येत आसलेल्या १५ ते २० हजार रुपयांचा श्रीगोंदा तहसील कार्यालय व पुरवठा अधिकारी भ्रष्टाचार करतात. ग्राहक पंचायतीचे कार्यकर्ते पोट तिडकेने ग्राहकांच्या समस्या प्रश्न व प्रत्येक शासकीय कार्यालयातील दलालीचा मुद्दा प्रत्येक बैठकीत तालुकास्तरावर आपला वेळ खर्च करून मांडतात. परंतु तहसीलदार व पुरवठा अधिकारी तसेच जिल्ह्याचे जिल्हाधिकारी व जिल्हा पुरवठा अधिकारी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या पदाधिकाऱ्यांना कोणत्याही प्रकारचे सहकार्य करत नाहीत. त्यामुळे वर्षानुवर्ष या दिनाचे महत्त्व व हा दिन कोणत्याही ग्राहकांची तक्रार न सोडवता साजरा करण्यात व अधिकाऱ्यांना अनुपस्थित ठेवण्यात तहसीलदार व पुरवठा अधिकारी यांचाच श्रीगोंदा तालुक्यात हात असल्यामुळे प्रत्येक शासकीय कार्यालयात सर्वसामान्यांचे प्रश्न तसेच भिजत पडलेले असतात.भ्रष्टाचार बोकाळलेला आहे.

राजकीय पदाधिकारी व अधिकाऱ्यांच्या संगनमताने भ्रष्टाचार फोफावला असून गॅस टंचाईच्या नावाखाली अधिकारी ग्राहक दिन घेण्यास टाळाटाळ करत असतील तर, ग्राहक पंचायतीचे पदाधिकारी लवकरच याबाबत उपोषणाचा निर्णय घेणार असल्याची माहिती पितळे यांनी यावेळी बोलताना दिली. अधिकाऱ्यांनी आपल्या जबाबदारीचे गांभीर्य ओळखून लवकरात लवकर श्रीगोंदा तहसील कार्यालयात १५ मार्च हा जागतिक ग्राहक दिनाचा कार्यक्रम सर्व अधिकाऱ्यांच्या उपस्थित पार पडेल याची दक्षता व खबरदारी घ्यावी. अन्यथा आम्ही जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यालयात घेराव घालून श्रीगोंदा तहसील पुढे उपोषणाचा निर्णय घेणार असल्याची माहिती ग्राहक पंचायतीचे तालुकाध्यक्ष अनंता पवार,संघटक प्रदीप डहाळे,शिवाजी साळुंके,सुरेश पिपाडा, गणेश लाढाणे,गणेश गडदे,संतोष रोडे,मदन गडदे, संतोष जठार,दतात्रय हिरडे,अजित पटवा, रामदास कुसाळकर,प्रम ोद पवार,किरण शिंदे सर यांनी दिली.

## जय आनंद महावीर युवक मंडळातर्फे

# २८ मार्चला महाभोजन कार्यक्रमाचे आयोजन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर** : भारतीय संस्कृतीत भुकेलेल्यांना अन्न देणे आणि भगवंताच्या नामाचे स्मरण करणे या दोन गोष्टींना अतिशय महत्त्व आहे. मानवसेवेलाच ईश्वरसेवा मानून सर्वांना संस्कारांची शिदोरी देणाऱ्या राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या ३४ व्या पुण्यस्मृतीनिमित्त नवीपेठ येथील जय आनंद महावीर युवक मंडळाने सालाबादप्रमाणे यंदाही शनिवार दि.२८ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत अन्नदान (महाभोजन) कार्यक्रम आयोजित केला आहे, अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत यांनी दिली.

आचार्य आनंदऋषीजी महाराजांच्या शिकवणुकीप्रमाणे कार्य करणाऱ्या जय आनंद महावीर युवक मंडळाने अनेक वर्षांपूर्वी आचार्यश्रींच्या स्मृतीदिनी अन्नदानाचा उपक्रम सुरू केला. यंदा मंडळ रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करीत आहे. दरवर्षी अनेकांच्या सहकार्यातून हा उपक्रम राबविला जातो. पुरीभाजी, बुंदी, मसालेभात अशा रूचकर भोजनाचा आस्वाद उपस्थित घेतात. शुध्द व थंडगार पाण्याचीही स्वतंत्र व्यवस्था केली जाते.

जय आनंद मंडळाच्या या महाभोजनाचा दरवर्षी हजारोंच्या संख्येने भाविक लाभ घेतात. आचार्य आनंदऋषीजी महाराजांचा हा प्रसाद आहे, अशी श्रध्दा भाविकांमधून मंडळाचे कार्यकर्ते ऐकतात तेव्हा भारावून जातात. मंडळातफ ेर्व वंचित मुलांच्या विविध संस्थांनाही प्राधान्याने भोजन पोहोच केले जाते. या कार्यक्रमासाठी मंडळाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते तब्बल महिनाभर परिश्रम घेतात.

दि.२८ मार्च २०२६ ला नवीपेठमध्ये आयोजित केलेल्या या महाभोजनाचा जास्तीत जास्त भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जय आनंद महावीर युवक मंडळ रौप्य महोत्सवी वर्षाचे कार्याध्यक्ष सत्येन मुथा व मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## व्यावसायिक महिलेला मारहाण प्रकरण

# निषेधार्थ मंगळवारी श्रीगोंदा शहर बंद

**लिंपणगाव** : श्रीगोंदा शहरातील महात्मा फुले उद्यान परिसरात असलेल्या अभ्यासिकेत काही आदिवासी समाजातील व्यक्तींनी अतिक्रमण केले असुन त्या परिसरात व्यवसाय करणाऱ्या स्थानिक नागरिकांना त्रास दिला जात आहे.

या प्रकरणाच्या निषेधार्थ मंगळवारी (दि. २४ म ार्च) श्रीगोंदा शहर बंदची हाक नागरिकांनी दिली आहे.

श्रीगोंदा पोलीस स्टेशनमध्ये दिलेल्या निवेदनानुसार, उद्यानाजवळ नगरपरिषदेने बांधलेल्या अभ्यासिकेत काही आदिवासी समाजातील व्यक्तींनी अतिक्रमण केले असुन शेजारी भरत असलेल्या भाजी मंडईतील व्यापाऱ्यांना व नागरिकांना धमकावून खंडणीची मागणी केली जात आहे. तसेच 'अ‍ॅट्रॉसिटी'सारखे खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी देऊन दबाव टाकला जात असल्याचे निवेदनात म्हटले आहे.


दरम्यान, शनिवारी सायंकाळी आईस्क्रीम विकणाऱ्या एका महिलेकडे खंडणीची मागणी करून तिला म ारहाण करण्यात आल्याची घटना घडल्याचे नागरिकांनी सांगितले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधितांवर तातडीने कठोर कारवाई करावी, अतिक्रमण हटवावे आणि नागरिकांना संरक्षण द्यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी प्रशासनाकडे केली आहे. अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. दरम्यान, या प्रकरणी पोलिस प्रशासन काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## देवटाकळी प्राथमिक आरोग्य उपकेंद्र

# असून अडचण नसून खोळंबा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री


तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय
शेवगाव दि. ०४/०३/२०२६

प्रति,
वैद्यकीय अधिकारी
प्रा आ केंद्र दहिगावने शेवगाव

(डॉ.लोणकर एस.एस.)
तालुका आरोग्य अधिकारी
पंचायत समिती शेवगांव

प्रत – मा मुख्य कार्यकारी अधिकारी जि प अहिल्यानगर यांना माहितीस्तव सविनय सादर .
प्रत– मा जिल्हा आरोग्य अधिकारी जि प अहमदनगर यांना माहितीस्तव सविनय सादर .
प्रत – मा.गट विकास अधिकारी पंचायत समिती शेवगाव यांना माहितीस्तव सविनय सादर .

**शहरटाकळी** : शेवगाव तालुक्यातील देवटाकळी येथील प्राथमीक आरोग्य उपकेंद्र हे सतत बंद असुन, उपकेंद्रातील कर्मचारी मुख्यालय राहत नाहीत तक्रारी करूनही वरिष्ठ अधिकारी कुठलीही कारवाई करीत नाही त्यामुळे देवटाकळी प्राथमीक आरोग्य उपकेंद्र हे जनतेसाठी असून अडचन नसून खोळंबा या प्रमाणे बनले आहे

शेवगाव तालुक्यातील देवटाकळी येथील प्राथमीक आरोग्य उपकेंद्र हे

प्राथमिक आरोग्य केंद्र दहिगाव ने तालुका शेवगाव जिल्हा अहिल्यानगर यांच्या कार्यक्षेत्रामध्ये उपकेंद्र कार्यरत आहे. या उपकेंद्रामध्ये एकूण चार कर्मचारी कार्यरत असून उपकेंद्र वेळेवर उघडे राहत नसून तसेच तेथे कार्यरत कर्मचारी हे मुख्यालयी राहत नसले बाबत वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र दहिगावणे व माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांच्याकडे सामाजिक कार्यकर्ते देविदास शिरसाट यांनी वेळोवेळी तक्रार दिलेल्या आहेत. संबंधित उपकेंद्राच्या अनियमिततेबाबत अनेक नागरिकांनी वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे यापूर्वीही तक्रारी केल्या आहेत.

परंतु संबंधित वैद्यकीय अधिकारी कुठलीही कारवाई करीत नसल्यामुळे उपकेंद्राच्या कारभारात कुठलाही फरक झालेला नाही. गावात कुठलीही वैद्यकीय सुविधा उपलब्ध नसल्यामुळे तसेच हे उपकेंद्र देखील कधी चालू आणि कधी बंद असल्यामुळे नागरिकांना तातडीने प्रथमोपचार मिळण्यास अडचणी निर्माण होत आहेत. देवटाकळी उपकेंद्र हे असून अडचण आणि नसून खोळंबा अशी परिस्थिती झाली आहे .

शासन निर्णयानुसार आरोग्य कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहणे बंधनकारक करण्यात आलेले असून देखील देवटाकळी उपकेंद्राचे कोणतेही कर्मचारी मुख्यालयी राहत नाहीत. देवटाकळी येथे मजुरी करणाऱ्या नागरिकांची संख्या जास्त असल्यामुळे ते सकाळी नऊ वाजताच मजुरीला जाऊन संध्याकाळी साडेसहा वाजता परत येतात.

एखाद्या मजुराच्या बाबतीत जर काही आपत्कालीन परिस्थिती उद्भवली तर उपकेंद्र बंद असल्यामुळे त्याला तात्पुरते प्रथमोपचार मिळण्यास अडथळा येतो तसेच उपकेंद्रामध्ये कर्मचारी राहात नसल्यामुळे एखाद्या गर्भवती महिलेचे जर रात्री दुखायला लागले तर तिला तातडीने उपचार मिळत नाही या अनुषंगाने मा. तालुका आरोग्य अधिकारी यांचेकडे देखील अनेक वेळा दूरध्वनी वरून तक्रार केलेली आहे परंतु उपकेंद्राच्या वेळेमध्ये तसेच कर्मचाऱ्यांच्या वास्तव्यामध्ये कुठलाही बदल होत नाही.यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीसा काढल्या .

यापुढे कुठलीही कारवाई होत नाही त्यामुळे इथून पुढे जर उपकेंद्र सतत चालू नसेल आणि कर्मचारी जर वास्तव्यास येत नसतील तर त्यांना देण्यात येणारा घर भाडे भत्ता बंद करण्यात यावा तसेच त्यांना यापूर्वी दिलेला घर भाडे भत्ता वसूल करण्यात यावा तसेच संबंधित कर्मचाऱ्यावर जिल्हा परिषद सेवा शिस्तभंगाची कारवाई करून बडतर्फ करण्यात यावे अन्यथा तालुका आरोग्य आरोग्य अधिकारी कार्यालय पंचायत समिती यांचे दालणा समोर आमरण उपोषण सामाजिक कार्यकर्त देविदास शिरसाट यांनी संबंधित विभागांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

# श्रीक्षेत्र अमरापूरच्या देवस्थानात गर्दीचा उच्चांक

## गर्द हिरवाईने पर्यटकांनाही केले मोहित



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** : श्री क्षेत्र अमरापूरच्या श्री रेणुकामाता देवस्थानात सध्या वासंतिक नवरात्रोत्सवानिमित्त रेणुका मातेच्या दर्शना साठी भाविकांची मोठी गर्दी वाढली आहे . आज शनिवारी तसऱ्या माळेस तर गर्दीने उच्चांक केला. साडेतीन शक्ती पिठापैकी एक असलेल्या माहुरगड निवासीनी श्री रेणुका मातेचेच श्रीक्षेत्र अमरापूर ठाणे असल्याने जे भाविक माहूरला जाऊ शकत नाहीत असे लाखो भाविक येथे येऊन नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून आई साहेबांच्या दर्शनाची पर्वणी साधत असतात .

श्री क्षेत्र अमरापूरच्या रेणुका माता देवस्थानात माहूरगडा प्रमाणेच आईसाहेबांना रोज नवी साडी नेसविली जाते.,रोज पुरणावरणाचा नैवेद्य केला जातो, असे पुजा अर्चेचे सर्व विधी नियमित केले जातात .

आईसाहेबांच्या रोजच्या पुजा अर्चेसाठी देवस्थानात तीन निवासी पुजारी आहेत . या शिवाय उत्सव काळात पाथर्डीचे वेशासं सच्चिदानंद देवा देशपांडे यांच्या सह ११ ब्रह्म वृंद सप्तशतीपाठ व अन्य पुजा पाठासाठी उपस्थित असतात .रेणुका भक्तानुरागी डॉ. प्रशांत भालेराव, जयंती भालेराव, प्रज्ञेश भालेराव, रुद्रांश भालेराव यांनी तिसऱ्या माळेची पूजा बांधली .

रेणुका भक्तानुरागी ज्येष्ठ अर्थतज्ञ डॉ. प्रशांत भालेराव यांच्या संकल्पनेतून देवस्थानाला जोडून येथे गोशाळा असून शेजारीच तीन मजली भव्य भक्त निवास उभारण्यात आले आहे .

तेथील भोजनगृहात भाविकांसाठी भंडाऱ्याचे नियमीत आयोजन असते . तिसऱ्या माळेचे औचित्य साधून शनिवारीही मिष्टान्न प्रसादाची सोय करण्यात आली होती.

पर्यावरण रक्षणा साठी साडेपाच एकर क्षेत्रात आईसाहेबाच्या भव्य मंदिर परिसरात तीन हजारावर विविध जातीचे वृक्ष वल्ली लावली असून सध्या हा परिसर घनदाट हिखाईने नटला आहे.

छत्रपती संभाजी नगर - बारामती राज्य म ार्गालगत असलेल्या या देवस्थानात प्रवेश केला की , नयनरम्य हिरवाई व देवस्थानाच्या पवित्र वातावरणामुळे भाविक बाहेरचे जग विसरतात. आज सकाळीच पाथर्डीचे प्रथम नगराध्यक्ष सुभाष घोडके, लोणीच्या डॉ.पद्मश्री विखे पाटील म हाविद्यालयाचे माजी उपप्राचार्य दत्तात्रय थोरात, पुण्याच्या फोक्सवॅगन कंपनीचे एम डी अभि थोरात यांनी सपत्नीक मातेच्या दर्शनासाठी हजेरी लावली. त्यानंतर साडेअकराच्या आरतीला शेवगाव पाथर्डी पंचक्रोशीतील भाविकांनी मोठी गर्दी केली . त्यामुळे देवस्थानचे पार्किंग अपूर्ण पडले .

या वेळी आखेगावचे जोग महाराज संस्कार केंद्राचे प्रमुख राम महाराज झिंजुर्के,हनुमान टाकळीचे महंत रमेश अप्पा महाराज यांनी उपस्थित भाविकांचे उद्बोधन केले . शिवसेना नेते रामदास गोल्हार,श्रीरामपूरचे शिवसेना नेते अशोक थोरे, म ाजी नगर सेवक अजय भारस्कर, मुंबईचे उद्योजक नवनाथ नलवडे, गट शिक्षणाधिकारी शैलजा राऊळ,तसेच रेणुका परिवारातील श्रीमंत घुले, प्रा जनार्दन लांडे पाटील,डॉ अरविंद पोटफोडे, एकनाथ कुसळकर, बाळासाहेब चौधरी, राहूल वाघमारे, यांचेसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

द • ख • ल

## महावितरण तक्रार निवारण मंचात ग्राहक दिन साजरा



**पुणे** : कसबापेठ येथील महावितरणच्या ग्राहक तक्रार निवारण मंचातर्फे नुकताच जागतिक ग्राहक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. जागतिक ग्राहक दिनाच्या निमित्ताने महावितरण ग्राहक तक्रार निवारण मंचाने उपस्थित नागरिकांना वीज ग्राहकांच्या हक्काची माहिती दिली. ग्राहक तक्रार निवारण व मंचाचे कामकाज याबद्दल मंचाचे अध्यक्ष श्री. महेंद्र दिवाकर, स्वतंत्र सदस्य अरुण वाघमारे व सदस्य सचिव श्रीमती अपर्णा मुनशेट्टीवार यांनी यावेळी सखोल मार्गदर्शन केले. तसेच ग्राहकांना वीज सेवेबद्दल वारंवार पडणाऱ्या प्रश्नांची उदाहरणासहित असलेल्या छापील पुस्तिकेचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी ग्राहक, ग्राहक प्रतिनिधी, ग्राहक पंचायतीचे आजी-माजी पदाधिकारी आदींची उपस्थिती होती.

## हवामान विभागाचे ग्रंथालय ठरतेय संशोधनाचे केंद्र

**पुणे** : बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर अचूक अंदाजासाठी पुणे हवामान विभागातील ९२ वर्षांचे ग्रंथालय संशोधनाचे महत्त्वाचे केंद्र ठरत आहे. १९२८ मध्ये ब्रिटिश काळात स्थापन झालेल्या या ग्रंथालयात सध्या सुमारे १३ हजारांहून अधिक पुस्तके असून हवामानशास्त्र, वातावरणीय बदल, संगणकशास्त्र व सांख्यिकी विषयांवरील समृद्ध माहिती उपलब्ध आहे. या ग्रंथालयाचा उपयोग राज्यासह देशभरातील विद्यार्थी व शास्त्रज्ञ अभ्यासासाठी करत आहेत. दोन मजली, सुसज्ज आणि हवेशीर अशा या ग्रंथालयात वाचनकक्ष, संगणक सुविधा, वाय-फाय, तसेच ऑनलाइन पुस्तक शोध व्यवस्था उपलब्ध आहे. दुर्मिळ ग्रंथांचे जतनही येथे करण्यात आले आहे. डिजिटल ग्रंथालय विकसित करण्यावर भर देण्यात येत असून विविध हवामानविषयक अहवाल व माहिती संग्रहीत केली जात आहे. विज्ञान दिन (२८ फेब्रुवारी) व जागतिक हवामान दिन (२३ मार्च) निमित्त हे ग्रंथालय सर्वांसाठी खुले ठेवले जाते. त्यामुळे हवामान विषयक अभ्यासासाठी हे ग्रंथालय मार्गदर्शक ठरत आहे.

## आर्क्टिकमधील बर्फ वितळण्याचा मान्सूनवर परिणाम

**पुणे** : आर्क्टिक प्रदेशातील समुद्री बर्फाचे प्रमाण कमी झाल्यास भारतातील उशिराच्या टप्प्यातील मान्सून पावसावर त्याचा लक्षणीय परिणाम होतो. विशेषतः ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यातील पावसाचे प्रमाण वाढून मान्सूनचा पावसाचा पट्टा पश्चिमेकडे सरकतो, असे संशोधनातून स्पष्ट झाले आहे. भारतातील उन्हाळी मान्सून हंगाम जून ते सप्टेंबरदरम्यान असतो. या कालावधीत देशातील वार्षिक पर्जन्यमानापैकी सुमारे ८० टक्के पाऊस पडतो. गेल्या काही दशकांत मान्सून पावसाचे एकूण प्रमाण वाढताना दिसत असले तरी त्याचे भौगोलिक वितरण बदलत असल्याचे हवामान अभ्यासातून स्पष्ट झाले आहे. विशेषतः पावसाचा मुख्य पट्टा हळूहळू पश्चिमेकडे सरकत असल्याची प्रवृत्ती दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय उष्णकटिबंधीय हवामान संशोधन संस्थेच्या (आयआयटीएम) शास्त्रज्ञांनी आर्क्टिक समुद्री बर्फ वितळणे आणि भारतीय उन्हाळी मान्सून पर्जन्यमान यांचा परस्परसंबंध तपासणारा महत्त्वपूर्ण अभ्यास केला आहे. हा अभ्यास २९ जानेवारी रोजी 'ओशन-लँड-ॲटमॉस्फिअर रिसर्च' या आंतरराष्ट्रीय नियतकालिकात प्रसिद्ध झाला आहे.

# निरगुडसर येथील वळसेमळा येथे बंद बंगल्यात चोरी

## २८ तोळे दागिने चोरीला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर** : निरगुडसर ता. आंबेगाव येथील वळसे मळा येथील शीला सोनु वळसे पाटील यांच्या बंगल्यात चोरी झाली असून तब्बल २८ तोळे दागिने चोरट्यांनी चोरून नेले आहेत या घटनेने परिसरात भीतीच्या वातावरण पसरलेल्या असून पोलिसांनी रात्रीची कष्ट वाढवावी व चोरट्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी होत आहे. याबाबत अधिक माहिती अशी की वळसे मळा येथे शीला वळसे पाटील या बंगल्यात एकट्याच राहतात. दोन दिवसापूर्वी गुढीपाडव्यानिमित्त त्या माहेरी यात्रेसाठी गेल्या होत्या.



जाताना त्यां बंगल्याचे दरवाजे बंद करून गेल्या होत्या. दोन दिवस तिथे राहिल्यानंतर दिनांक २१ रोजी सायंकाळी त्या घरी आले असता त्यांना घराचे दरवाजे उघडे दिसले तसेच कपाटातील सामानही अस्ताव्यस्त झाल्याचे दिसते. त्यावेळी त्यांनी कपाटात पाहिले असता कपाटात ठेवलेले तब्बल २८ तोळे दागिने चोरीला गेले असल्याचे समजले. यामध्ये पाटल्या सहा तोळे, बांगड्या सहा तोळे, मोहनमाळ तीन तोळे, मंगळसूत्र सहा तोळे, अंगठ्या चार तोळे, बारीक मण्यांची माळ एक तोळे, कानातले दागिणे चोरून नेले आहे. घटनेची माहिती कळताच पारगाव पोलिसांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा केला आहे.

दोन दिवस बंगला बंद असल्याने चोरी नक्की कधी झाली याबाबत अधिकृत माहिती मिळाली नसून पोलीस या घटनेचा सखोल तपास करत आहे. ज्येष्ठ नागरिकांनी घरात मौल्यवान दागिने ठेवू नये बाहेर जाताना ते सुरक्षित ठिकाणी ठेवावे. संशयित व्यक्ती आढळून आल्यास पोलीस ठाण्यात कळवावे असे आवाहन पारगाव पोलिसांनी केले आहे.

## देशाच्या अर्थकारणाला वेगळी दिशा देण्याची ताकद : मंत्री चंद्रकांत पाटील

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : आपण परंपरागत गायीला माता म्हणतो, मात्र गायीपासून इतकी उत्पादने तयार होऊ शकतात हे आपल्याला माहित नाही. गोमूत्र, शेणापासून साकारलेल्या अनेक वस्तूंचा समावेश या अद्भुत अद्वितीय प्रदर्शनात आहे. सर्वसामान्य माणसाला याची कल्पना येऊ शकत नाही, की गायीचे काय काय उपयोग आहेत. देशाच्या अर्थकारणाला वेगळी दिशा देण्याची ताकद गाईमध्ये आहे, असे मत राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले. आंतरराष्ट्रीय संस्था ग्लोबल कॉन्फेडरेशन ऑफ काऊ बेस्ड इंडस्ट्रीज (जीसीसीआय) यांच्या वतीने, महाराष्ट्र गो सेवा आयोग आणि आर. आर. काबेल यांच्या सहकार्याने गौ टेक २०२६ या आंतरराष्ट्रीय शिखर परिषद व प्रदर्शनाचे आयोजन कृषी महाविद्यालय मैदान, शिवाजीनगर, पुणे येथे करण्यात आले आहे. या प्रदर्शनाला कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, चंद्रकांत पाटील, राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांसह अनेक मान्यवरांनी भेट दिली.

जीसीसीआयचे संस्थापक, माजी केंद्रीय मंत्री तसेच राष्ट्रीय कामधेनू आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. वल्लभभाई कथिरिया, महाराष्ट्र गौ सेवा आयोगाचे अध्यक्ष व गौ टेक २०२६ चे आयोजनाध्यक्ष शेखर मुंदडा यावेळी उपस्थित होते.

# दहिवडी यश गायकवाड प्रकरणात खुनाचा गुन्हा दाखल

## शिक्रापूरचे पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड झाले फिर्यादी

**प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे** : दहिवडी (ता. शिरूर) येथे २१ जून २०२४ रोजी यश गायकवाड या बालकाचा संशयास्पद मृतदेह आढळून आल्यानंतर त्याच्यावर बिबट्याचा हल्ला असल्याचे बोलले जाऊ लागले मात्र सबळ पुरावा नसल्याने वनविभागाने त्याला दुजोरा दिला होता, अखेर त्याच प्रमाणे दुसरी घटना घडल्यानंतर यश गायकवाड यांचा खून झाल्याचे निष्पन्न झाल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांनी स्वतः फिर्यादी होत आरोपी अक्षय दत्तात्रय मांजरे यांच्या विरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.



दहिवडी (ता. शिरूर) येथे २१ जून २०२४ रोजी यश सुरेश गायकवाड या दहा वर्षीय बालकाचा शेतातील विहिरीजवळ मृतदेह आढळून आला होता, मात्र यावेळी त्याच्यावर बिबट्याचा हल्ला की खून याबाबत संभ्रम निर्माण झाला, त्यानंतर वन विभागाकडून त्याबाबत बिबट्याचा हल्ला असल्याबाबत काही ठोस निर्णय न झाल्याने ते प्रकरण तसेच प्रलंबित राहिले, तर नुकतेच १७ मार्च २०२६ रोजी पुन्हा त्याच पद्धतीने साईराज मांजरे या बालकाचा मृतदेह आढळून आल्याने ग्रामस्थांच्या संतप्त प्रतिक्रिया नंतर पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करत आरोपी अक्षय मांजरे याला अटक केली,

### प्रांताधिकाऱ्यांनी अहवाल दिला कसा . . . . .

दहिवडी (ता. शिरूर) येथे २१ जून २०२४ रोजी यश गायकवाड चा मृत्यू बिबट्याच्या हल्लयात नसल्याबाबतचा अहवाल रक्ताच्या नमुन्यावरून वन विभागाकडे प्राप्त झाला, मात्र त्यानंतर वनविभागाकडून मिळणारी नुकसान भरपाई गायकवाड कुटुंबियांना मिळालेली नसताना नुकतेच प्रांताधिकारी विठ्ठल जोशी यांनी यश गायकवाड याचा मृत्यू बिबट्याचे हल्लयाने झाल्याबाबतचा अहवाल नुकतेच २ मार्च २०२६ रोजी दिला त्यामुळे प्रांताधिकाऱ्यांच्या अहवालावर देखील संशय व्यक्त केला जात आहे आणि बिबट्याचा हल्ला झालेला नसताना आणि आरोपीने स्वतः खून केलेले असल्याची कबुली दिलेली असताना प्रांताधिकारी यांनी बिबट्याचा हल्ला म्हटलेच कशी असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

दरम्यान त्याच्याकडे तपास करत असताना अक्षय मांजरे यानेच पूर्वी यश गायकवाड याचा देखील स्वतः खून करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने विहिरीमध्ये ढकलून नंतर मृतदेह शेतात टाकल्याचे कबूल केले, त्यामुळे यश गायकवाड यांच्यावर बिबट्याचा हल्ला नसून खून असल्याचे समोर आल्याने स्वतः शिक्रापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दिपरतन गोरख गायकवाड (वय ४९ वर्षे रा. शिक्रापूर ता. शिरूर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी अक्षय दत्तात्रय मांजरे (वय २१ वर्षे रा. मांजरेवस्ती दहिवडी ता. शिरुर जि. पुणे) याच्याविरुद्ध नव्याने खुनाचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक महेश डोंगरे हे करत आहे.

## पुणे परिमंडलात ७१२२ ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : वारंवार पाठपुरावा करुनही वीजबिल भरण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या थकबाकीदारांविरुद्ध महावितरणने आक्रमक पवित्रा घेतला आहे. तर दुसरीकडे महावितरणची मार्च एण्ड मोहीम या परिस्थितीत वीजग्राहकांनी आपले वीजबिल थकबाकीसह भरुन गुढीपाडवा गोड करावा, वाद टाळून महावितरणला सहकार्य करावे असे आवाहन पुणे परिमंडलाकडून करण्यात आले आहे. पुणे परिमंडलात ३१९ कोटी ५० लाख रुपयांच्या थकबाकी वसुलीसाठी धडक मोहीम राबवण्यात येत असून, १ मार्चपासून ७१२२ ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित केलेला आहे. मार्च अखेर थकबाकी शून्य करण्यासाठी महावितरणने थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्यास सुरुवात केली आहे. वसुलीसाठी महावितरणने विभागनिहाय पथके तयार करून थकबाकीदार ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित करण्याची प्रक्रिया वेगवान केली आहे. थकबाकीसाठी वीजपुरवठा नाईलाजाने खंडित करावा लागत आहे. त्यातून अनेक ठिकाणी वादावादीचे प्रसंग उद्भवत आहे. तसेच वीजपुरवठा खंडित केल्यास पुनर्रजोडणी शुल्काचा भुर्दंड ग्राहकांना बसणार आहे. १ मार्च ते ९ मार्च २०२६ या कालावधीत ७ हजार १२२ ग्राहकांचा वीज पुरवठा आधीच खंडित करण्यात आला आहे. यामध्ये १ हजार ७२५ कायमस्वरूपी तर ५ हजार ३९७ तात्पुरत्या स्वरूपातील खंडित जोडण्यांचा समावेश आहे.

## मांडवगण फराटा येथे गोळीबार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई** : शिरूर तालुक्यातील मांडवगण फराटा येथे भैरवनाथ स्टेडियम परिसरात भांडण मिटवण्याच्या बहाण्याने बोलावून गोळीबार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेत अक्षय गोविंदा पाटील (वय २९, रा. तळेगाव ढमढेरे) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर ससून रुग्णालयात उपचार सुरू आहेत.याप्रकरणी शिरूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर करण्यात आला असून अमोल आनंदा चौगुले (वय ३०), संदीप उर्फ भैय्या तेलंग (वय २७) व संदीप सुदाम गिरे (वय ३५, सर्व रा. मांडवगण फराटा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिरूर पोलिसांकडून मिळालेल्या माहिती नुसार १९ मार्च २६ रोजी दुपारी सुमारे २.३० वाजता अमोल चौगुले यांनी फिर्यादी अक्षय पाटील यांना फोन करून भांडण मिटवण्यासाठी मांडवगण फराटा येथे बोलावले. त्यानुसार पाटील हे त्यांच्या मित्रांसह कारने तेथे पोहोचले.तेथे पोहोचल्यानंतर अमोल चौगुले यांनी पाटील यांची कॉलर पकडून वाद घातला. यावेळी संदीप गिरे यांनी जवळील पिस्टल काढून पाटील यांच्या दिशेने गोळीबार केला. त्यानंतर पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना अमोल चौगुले यांनी पिस्टल घेऊन पुन्हा गोळीबार केला. या गोळीबारात पाटील यांच्या उजव्या बरगडीवर गोळी लागून ते जखमी झाले. जखमी पाटील यांना प्रथम वाघोली येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले, त्यानंतर पुढील उपचारासाठी पुणे येथील ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान त्यांचा जबाब नोंदवून गुन्हा दाखल करण्यात आला.

## मुलींच्या स्वसंरक्षणाच्यादृष्टीने महत्त्वाचा उपक्रम : ना. दादाजी भुसे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : 'राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत मिळणारे मार्गदर्शन केवळ मुलींसाठी कराटे प्रशिक्षण नसून एक स्वसंरक्षण, आत्मविश्वास व सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचा उपक्रम म्हणून मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी व्यक्त केला. सर परशुराम महाविद्यालय पुणे येथे शालेय शिक्षण व क्रीडा विभागाअंतर्गत आयोजित राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्धाटनप्रसंगी ते बोलत होते. पुणे शहराच्या महापौर मंजुषा नागपुरे, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे संचालक डॉ .हेमंत वसेकर, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. महेश पालकर, प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, संचालक योजना श्रीकृष्ण कुमार पाटील, एससीआरटी सहसंचालक तथा राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा प्रशिक्षण कार्यक्रमाचे राज्य समन्वयक डॉ.कमलादेवी आवटे, पुणे मनपा शिक्षण समितीचे अध्यक्ष अरुण राजवाडे उपाध्यक्ष अतुलजी तरवडे आदी उपस्थित होते . श्री. भुसे म्हणाले, स्वसंरक्षण हे केवळ शारीरिक प्रशिक्षण नसून ते विद्यार्थिनींच्या आयुष्यातील एक



महत्त्वाची शिस्त आहे.

प्रत्येक मुलीने स्वतःच्या पायावर उभे राहून स्वतःचे रक्षण करण्यास सक्षम झाले पाहिजे. शिक्षण म्हणजे केवळ चार भिंतींमध्ये मिळणारे शिक्षण नसून आयुष्यातील प्रत्येक संकटांना धैर्याने तोंड देणारे शिक्षण असावे, याच बाबीचा विचार करुन आजच्या युगात मुलींनी आत्मरक्षा, आत्मसंरक्षणाचे उत्तम धडे गिरवविण्याकरिता शालेय शिक्षण विभागाने 'राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा प्रशिक्षण कार्यक्रम' हे विशेष अभियान सुरू आहे. राज्याच्या शाळांमधील इयत्ता ६ वी ते १२ वीपर्यंतच्या विद्यार्थिनींसाठी या शैक्षणिक वर्षांपासून पासून हे प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहे. यामध्ये मार्शल आर्ट, माजी सैनिकांमार्फत प्रशिक्षण आणि योगा अशा विविध बाबींचा समावेश असून प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर विद्यार्थिनींना प्रमाणपत्र दिले जाणार आहे. महिला सबलीकरण, आत्मसंरक्षण आणि आत्मविश्वास वाढवण्यासाठी हा शासनाचा एक महत्त्वाकांक्षी उपक्रम असणार आहे. प्रत्येक महिला स्वतःच्या पायावर व सुरक्षित उभी राहण्यासाठी सर्व शाळांतील मुलींनी हे प्रशिक्षण घ्यावे. शिक्षणाबरोबर कला व क्रीडा उपक्रमाना प्राधान्य दिले जाईल. शाळेतील विद्यार्थिनींना शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सक्षम करणे हे आमचे प्राधान्य आहे, या प्रशिक्षणातून विद्यार्थ्यांनीमध्ये मनोबल वाढेल असा विश्वास मंत्री श्री. भुसे यांनी व्यक्त केला.

# टाकळी हाजी ग्रामपंचायतीकडून महावितरणला निवेदन

## सायंकाळी होणारे लोडशेडिंग रद्द करण्याची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई** : शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी ग्रामपंचायतीने महावितरण कडून सायंकाळच्या वेळेत होत असलेल्या वीज कपाती विरोधात महत्त्वपूर्ण पाऊल उचलत महावितरणला निवेदन दिले आहे. ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच अरुणाताई दामुअण्णा घोडे यांनी दि. २२ रोजी शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी येथील श्री विठ्ठल मंदिरात आयोजित महवितारं अधिकारी पदाधिकारी,शेतकरी,ग्रामस्थ यांच्यात झालेल्या समन्वय बैठक व वीज समस्या व निवारण संदर्भात आयोजित सभेत केडगाव विभागातील कार्यकारी अभियंता विकास आल्हाट यांना निवेदन सादर केले.

यावेळी शिरूरचे माजी आमदार पोपटराव गावडे,भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रदीपदादा वळसे पाटील,जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र गावडे,प्रकाश



पवार महावितरण चे शिरूर सहायक अभियंता गोरे,टाकळी हाजी शाखा अभियंता नितीन मुरकुटे,या भागातील बहुसंख्य वायरमन,शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.ग्रामपंचायत ने दिलेल्या निवेदनात सायंकाळी ६ ते १० वाजेदरम्यान करण्यात येणारे लोडशेडिंग तात्काळ रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. ग्रामपंचायतीने दिलेल्या माहितीनुसार, दिनांक १८ मार्च २०२६ पासून टाकळी हाजी येथे नवीन वीज पुरवठा वेळापत्रक लागू करण्यात आले आहे. या वेळापत्रकानुसार सायंकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत वीज पुरवठा खंडित केला जात आहे. मात्र, ही वेळ सर्वसामान्य नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाची असल्याने गावात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, सध्या शाळा व महाविद्यालयांच्या परीक्षा सुरू असल्याने विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर या लोडशेडिंगचा थेट परिणाम होत आहे. सायंकाळची वेळ ही अभ्यासासाठी महत्त्वाची असताना वीज नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत असल्याची तक्रार करण्यात आली आहे.तसेच, सायंकाळच्या वेळेत संपूर्ण गाव अंधारात बुडाल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत आहे. विशेषतः महिला व लहान मुलांच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त करण्यात आली आहे. घरगुती कामेही अडथळ्यात येत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. शेतकऱ्यांच्या दृष्टीनेही ही परिस्थिती गंभीर ठरत असून, नवीन वेळापत्रकानुसार रात्री उशिरा वीज दिली जात असल्याने पिकांना पाणी देताना शेतकऱ्यांना वन्य प्राण्यांचा धोका वाढला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता पसरली आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर टाकळी हाजी ग्रामपंचायतीने महावितरण प्रशासनाला सायंकाळचे लोडशेडिंग तात्काळ रद्द करून दिवसा अधिक वेळ वीज पुरवठा करावा, तसेच वेळापत्रकात त्वरित सुधारणा करावी, अशी मागणी केली आहे. गावकऱ्यांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणाऱ्या या समस्येकडे महावितरण प्रशासन कितपत गांभीर्याने पाहते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# शिरूरमध्ये जागतिक वन दिन उत्साहात

## वन व वणवा मुक्त जंगलासाठी सामूहिक शपथ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई** : जागतिक वन दिनानिमित्त शिरूर रामलिंग येथे वन विभागाच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. वन व वणवा मुक्त जंगल या संकल्पनेला बळ देण्यासाठी उपस्थितांनी सामूहिक शपथ घेत वनसंवर्धनासाठी कटिबद्धता व्यक्त केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गणेगाव दुमाला येथील सरपंच तथा जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते हभप तुकाराम दगडू निंबाळकर होते.

प्रमुख पाहुणे व प्रमुख वक्ते म्हणून वरिष्ठ पत्रकार तथा युवा क्रांती फाउंडेशनचे राष्ट्रीय किसान विकास मंचचे प्रदेशाध्यक्ष प्रा. सुभाष शेटे यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी वनसंवर्धनाचे



महत्त्व अधोरेखित करत पर्यावरण रक्षणासाठी नागरिकांनी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास वन विभाग, वनपाल शिंदे मेजर (शिरूर), वन विभाग, वनरक्षक झिरपे (शिरूर), वन विभाग, वनरक्षक डोईफोडे (बाभूळसर बुद्रुक), वन विभाग, वनरक्षक सविता चव्हाण (मलठण), वन विभाग, वनरक्षक जे. व्ही. सानप (आळेगाव पागा) तसेच वन विभागाशी संलग्न न्हावरे कॅम्प सदस्य उपस्थित होते.

यावेळी मांडवगण फराटा येथील सामाजिक कार्यकर्ते अंकुश मुगुटराव जगताप तसेच राष्ट्रवादी महिला काँग्रेस, प्रदेश सचिव तृप्ती अजय सरोदे यांनीही कार्यक्रमास उपस्थिती दर्शविली. कार्यक्रमादरम्यान वनसंवर्धनाबाबत जनजागृती करण्यात आली असून जंगलांचे संरक्षण, वृक्षारोपण आणि वणव्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त केला. सामूहिक वन संरक्षणाची शपथ घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.


## ग्रामपंचायत श्रीरामनगर ता. हवेली जि.पुणे

**बी-१ निविदा सूचना -२/२०२५-२६**

प्रशासक ग्रामपंचायत श्रीरामनगर ता. हवेली जि. पुणे येथे मौजे श्रीरामनगर येथे सावतामाळी वस्ती मध्ये सिमेंट रस्ता करणे कामासाठी बी-१ पद्धतीने जि.प./ सार्वजनिक बांधकाम यांचे कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदर यांच्याकडून निविदा बी-१ दोन लिफाफा पद्धतीने सिलबंद लिफाफा मध्ये निविदा मागविण्यात येत आहे. दि. २३/०३/२०२६ सकाळी.१०.०० ते ३०/०३/२०२६ दु ५.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात बंद लिफाफा मध्ये कार्यालयीन वेळेत सादर करण्यात याव्यात.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम जीएसटी सह | अंदाजपत्रकीय रक्कम जीएसटी सोडून | इसारा रक्कम | कोरे निविदा रक्कम | कामाचा कालावधी | ठेकदार वर्ग h |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे श्रीरामनगर येथे सावतामाळी वस्ती मध्ये सिमेंट रस्ता करणे | ९९९९९०/- | ८४४६३९/- | ८४४६/- | ५९०/- | ३ महिने | खुला |

**निविदा अटी व शर्ती** १) कोणत्याही निविदा स्वीकारण्याचा अथवा निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतिकडे राखून ठेवला आहे २) कोऱ्या निविदा नमुन्याची फी (टेंडर फी) रक्कम ग्रामपंचायत श्रीरामनगर या नावाने चेक/कॅश ऑनलाईन भरून निविदा उपलब्ध होतील ३) निविदा मधील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे तांत्रिक लिफाफा मध्ये सादर करण्यात यावेत ४) इसारा रक्कम ग्रामपंचायत श्रीरामनगर या नावाने चेक/कॅश/ऑनलाईन/डीडी लिफाफा न १ मध्ये जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय लिफाफा क्र २ उघडला जाणार नाही.

**ग्रामपंचायत अधिकारी** — **ग्रामपंचायत श्रीरामनगर**

**प्रशासक** — **ग्रामपंचायत श्रीरामनगर**

# ५०४६ घरकुलांवर कारवाईचा इशारा

**✻ शेवगाव तालुक्यात प्रशासनाची धडक मोहीम; ३१ मार्च अंतिम मुदत**

**✻ काम सुरू न केल्यास अनुदान वसुली व घरकुल रद्द करण्याची कारवाई**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**शेवगाव :** शासनाच्या घरकुल योजनेंतर्गत मंजूर झालेल्या घरांचे बांधकाम प्रलंबित ठेवणाऱ्या लाभार्थ्यांवर आता प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. शेवगाव तालुक्यातील तब्बल ५०४६ घरकुल लाभार्थ्यांनी अद्याप बांधकामास सुरुवात न केल्याचे निदर्शनास आल्याने पंचायत समिती प्रशासनाने धडक मोहीम राबवत संबंधितांना अंतिम इशारा दिला आहे. ३१ मार्चपर्यंत काम सुरू न केल्यास अनुदानाची वसुली करून घरकुले रद्द करण्याची कारवाई केली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

तालुक्यात मोठ्या प्रमाणावर घरकुल मंजूर होऊनही अनेक लाभार्थी विविध कारणांनी बांधकाम पुढे ढकलत असल्याचे चित्र आहे. काही ठिकाणी आर्थिक अडचणी, तर काही ठिकाणी निष्काळजीपणा आणि नियोजनाचा अभाव ही कारणे पुढे येत आहेत. मात्र शासनाच्या निधीचा योग्य वापर व्हावा आणि गरजू कुटुंबांना प्रत्यक्ष निवारा मिळावा, या उद्देशाने प्रशासनाने आता कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

याच पार्श्वभूमीवर २५, २६, २७ फेब्रुवारी तसेच १ व ३ मार्च रोजी विशेष तपासणी मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेदरम्यान शेवगाव तालुक्यातील विविध गावांमध्ये अधिकारी, कर्मचारी व पथकांनी प्रत्यक्ष भेटी देत घरकुलांची पाहणी केली. सुमारे ७३१ लाभार्थ्यांच्या घरी जाऊन तपासणी करण्यात आली. काही लाभार्थ्यांनी कामास सुरुवात केली असली तरी अनेक ठिकाणी घरकुले पूर्णपणे प्रलंबित असल्याचे आढळले.

तपासणीदरम्यान काही लाभार्थ्यांकडे आवश्यक साहित्य उपलब्ध असूनही काम सुरू नसल्याचे दिसून आले. तर काही ठिकाणी घरकुलासाठी दिलेल्या निधीचा वापर इतर कारणांसाठी केल्याचेही संकेत मिळाले. या प्रकारांमुळे प्रशासनाने तीव्र नाराजी व्यक्त करत कारवाईची भूमिका घेतली आहे.

गटविकास अधिकारी सोनल शहा यांनी सांगितले की, शासनाच्या घरकुल योजनेचा उद्देश गरजू कुटुंबांना सुरक्षित व कायमस्वरूपी निवारा उपलब्ध करून देणे हा आहे. मात्र काही लाभार्थी या योजनेचा लाभ घेत असूनही बांधकाम पूर्ण करत नाहीत, ही गंभीर बाब आहे. त्यामुळे ३१ मार्च ही अंतिम मुदत देण्यात आली असून त्यानंतर कोणतीही सबब ग्राह्य धरली जाणार नाही.

प्रशासनाच्या या इशाऱ्यामुळे लाभार्थ्यांमध्ये खळबळ उडाली असून अनेकांनी आता बांधकामाला गती देण्यास सुरुवात केली आहे. गावागावांत घरकुलांचे काम सुरू करण्यासाठी हालचाली वेगाने होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. प्रशासनानेही पुढील काही दिवसांत पुन्हा पाहणी करून नियमभंग करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

दरम्यान, शासनाच्या योजनांचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांनी वेळेत काम पूर्ण करून स्वतःचा हक्काचा निवारा उभारावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## द•ख•ल

### निमगाव वाघा येथे रमजान ईद उत्साहात साजरी



**अहिल्यानगर :** नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे रमजान ईद मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरी करण्यात आली. गावातील मशिदीत मुस्लिम बांधवांनी सामुदायिक नमाज अदा करून गावाच्या सुख-समृद्धी, शांतता आणि प्रगतीसाठी प्रार्थना केली. या धार्मिक सोहळ्यानंतर हिंदू बांधवांनी मशिदीत उपस्थित राहून मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. एकमेकांना आलिंगन देत सण साजरा करण्यात आला आणि गावातील हिंदू-मुस्लिम ऐक्याचे दर्शन घडले.

मौलाना हाफिज अनजर यांच्या मार्गदर्शनाखाली नमाज पठण करण्यात आले. यावेळी डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे, चाँद शेख, प्राचार्य आदम शेख, साहेबराव बोडखे, सलीम शेख, गुड्डू शेख, दिलावर शेख, बाबुराव जाधव, ह.भ.प. एकनाथ महाराज धायतडक, हुसेन शेख, गुलाब शेख, उस्मान शेख, इस्माईल शेख, जालिंदर आतकर, आसिफ शेख, सादिक शेख, आबिद शेख, बख्तार सय्यद, बन्सी शेख, जावेद शेख, मुन्ना पठाण, शाहरुख शेख, बाबुभाई शेख, फिरोज शेख, मयूर काळे, संदीप डोंगरे, हबीब शेख आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### भक्तीमय वातावरणात मराठी नववर्षाचा प्रारंभ




**अहिल्यानगर :** मराठी नववर्ष गुढी पाडव्याच्या पार्श्वभूमीवर निंबळक गटातील हजारो महिलांना तुळजाभवानी मातेचे दर्शन घडविण्यात आले. माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव लामखडे यांच्या माध्यमातून कुलस्वामिनी तुळजाभवानी (तुळजापूर) यात्रेचा हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमासाठी दररोज ४० लक्झरी बसची व्यवस्था करण्यात आली होती, ज्यामुळे महिलांना सुरक्षित आणि सोयीस्कर प्रवासाचा अनुभव मिळाला.


रविवारी (दि.२२ मार्च) यात्रेच्या शेवटच्या टप्प्यात नेप्ती, हमीदपूर, हिंगणगाव, जखनगाव, टाकळी, खातगाव, निंबळक, इसळक आदी गावांतील महिला भाविकांना तुळजापूरकडे रवाना करण्यात आले. प्रवासादरम्यान महिलांसाठी नाश्त्याची तसेच तुळजापूर येथे देवदर्शनानंतर दुपारच्या भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती.

यावेळी उद्योजक अजय लामखडे, केतन लामखडे, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य शिवाजी होळकर, नेप्तीचे माजी सरपंच संजय जपकर, निंबळकचे उपसरपंच बाबासाहेब कोतकर, चेअरमन भाऊराव गायकवाड ,व्हा. चेअरमन अविनाश आळंदीकर , रामदास फुले ,बाळासाहेब पगारे ,पोपट खामकर, बाळासाहेब कोतकर, स्वाती घोलप, अनुसया गवळी, चंद्रकला गुलदगड आदी मान्यवर उपस्थित होते.

### एमआयडीसीत अधिकृत रिक्षा स्टॉपचा शुभारंभ

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर एमआयडीसी परिसरातील सह्याद्री चौक येथे अधिकृत रिक्षा स्टॉपचा शुभारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेचे अध्यक्ष अविनाश घुले, उपाध्यक्ष दत्ताभाऊ वामन, प्रमुख सल्लागार, सरचिटणीस अशोक औषीकर, नवनागापूर ग्रामपंचायत सदस्य बंडूनाना सप्रे व सागर सप्रे यांच्या हस्ते हा शुभारंभ करण्यात आला. यावेळी एमआयडीसी सह्याद्री चौक रिक्षा स्टॉप चे अध्यक्ष पंढरीनाथ सोनुले, उपाध्यक्ष अमोल कवडे, सल्लागार महादेव सानप, सचिव सुखदेव घोडके, खजिनदार सोमनाथ शिरसकर, नाथा गोरे, गोरख गोरे, रामदास तळेकर, संदीप सोडणार, निलेश पाडळे, अमोल फतरे, अंबादास ससाने, लक्ष्मण मोहोळकर, दादा गोल्हार, शशिकांत पगारे, संजय भाकरे आदीसह चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीगोंदा शहरासह विविध तालुक्यात
# रमजान ईद उत्साहात साजरी



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** श्रीगोंद्यात शहरासह तालुक्यात रमजान ईद (ईद-उल फित्र) शनिवार (दि.२१ मार्च) उत्साहात व शांततेत पार पडली. सकाळी १० वाजता ईदची सामुदायिक नमाज शहरातील आनंदकर मळा येथील ईदगाह मैदानावर मौलाना जैनुद्दीन आतार यांच्या मार्गदर्शनाखाली नमाज पठण करण्यात आली. नमाजसाठी शहरासह तालुक्यातील मुस्लिम बांधव अबालवृध्दांसह हजारोच्या संख्येने उपस्थित होते. तर महिलांची ची सामुदायीक नमाज सुफी संत शेख महंमद बाबा दर्गाह येथे संपन्न झाली.

रमजानच्या महिन्यात केलेल्या रोजा (उपवासाची) सांगता ईदच्या दिवशी झाली. रमजान महिन्याच्या ३० उपवासनंतर शुक्रवारी सायंकाळी चंद्रदर्शन झाल्याने शनिवारी सर्वत्र ईद उत्साहात साजरी करण्यात आली शहरातील विविध भागातील मशिदमध्ये सकाळी ९ वाजल्यापासून ईदच्या नमाजची व्यवस्था करण्यात आली होती. अनेक मशिदमध्ये मुस्लिम भाविकांनी नमाज अदा केली.

ईदगाहच्या सामुदायिक नमाजनंतर धार्मिक एकात्मता आणि देशाच्या समृध्दी व शांततेसाठी अल्लाह चरणी प्रार्थना करण्यात आली नमाजनंतर शहरातील कब्रस्तान व शेख महंमद बाबा दर्गामध्ये भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. घरोघरी शीरखुर्मा, गुलगुलेया बेत होता. शहरात दिवसभर मुस्लिम बांधवांसह इतर समाजबांधवांनी एकमेकांची गळाभेट घेत ईदच्या शुभेच्छा देत होते.

यानिमित्त शहरात सामाजिक एकतेचे दर्शनही घडले.

ईदगाह येथे माजी मंत्री बबनराव पाचपुते, घनश्याम शेलार, मनोहर पोटे, नगराध्यक्षा प्रतिनिधी संजय खेतमाळीस, उपनगराध्यक्ष प्रतिनिधी अक्षय अनभुले, नगरसेवक शहाजी खेतमाळीस, एम. डी. शिंदे, प्रशांत गोरे, दादा औटी, नानासाहेब आंदनकर, अनिल महाराज औटी, अरविंद कापसे, नाना शिंदे, मुकुंद सोनटके भाऊसाहेब खेतमाळीस, दिपक शिंदे, रावसाहेब घोडके, अशोक आळेकर, योगशे भोसले, श्रीगोंदा पोलिस उप निरीक्षक वाघमारे, सह आर्दीनी ईद निमित्त मुस्लिम बांधवाना शुभेच्छा दिल्या.

जामा मस्जिद ट्रस्ट च्या वतीने उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

ईद शांततेत होण्यासाठी पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ईदगाह मैदान व शहरासह श्रीगोंदा तालुक्यात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# पाथर्डीत ईदनिमित्त ऐक्याचा उत्सव; हजारोंनी अदा केली नमाज

**नगराध्यक्ष अभय आव्हाड यांचा शाही सत्कार**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**पाथर्डी :** पाथर्डी नगरीने पुन्हा एकदा सामाजिक सलोख्याचा आणि सांस्कृतिक एकतेचा प्रेरणादायी आदर्श घालून दिला. रमजान ईदच्या पवित्र पर्वावर शहरातील ऐतिहासिक ईदगाह मैदानावर हजारो मुस्लिम बांधवांनी एकत्र येत शांतता, प्रगती आणि बंधुभावासाठी नमाज अदा केली.

ईदच्या या मंगलमय वातावरणात सर्वत्र आनंद, उत्साह आणि एकात्मतेची भावना अनुभवायला मिळाली. या प्रसंगी तहसीलदार उद्धव नाईक, नगराध्यक्ष अभयराव आव्हाड, प्रथम नगराध्यक्ष सुभाषमामा घोडके, ज्येष्ठ पत्रकार अविनाश मंत्री, नगरसेवक बजरंग घोडके, देवा पवार, अमोल गर्जे, माजी नगरसेवक रामनाथ बंग, जगदंबा प्रतिष्ठानचे अध्यक्ष सोनू खेडकर, पोलीस उपनिरीक्षक निवृत्ती आगरकर तसेच सीताराम बापू बोरुडे आदी मान्यवरांनी उपस्थित राहून मुस्लिम बांधवांना गळाभेट देत ईदच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमातील विशेष आकर्षण ठरले ते नगराध्यक्ष अभयराव आव्हाड यांचा झालेला भव्य आणि शाही सत्कार. पाथर्डी शहरात विकासकामांसोबतच समाजातील विविध घटकांना जोडण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले आहे.

ज्येष्ठ पत्रकार अविनाश मंत्री यांनीही या उपक्रमाचे स्वागत करून सर्वांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमादरम्यान पोलीस प्रशासनाने अत्यंत चोख बंदोबस्त ठेवत शांततेत कार्यक्रम पार पडण्यासाठी मोलाची भूमिका बजावली. पोलीस उपनिरीक्षक निवृत्ती आगरकर यांच्या कार्याचेही मुस्लिम समाजाच्या वतीने विशेष कौतुक करण्यात आले.

# वांगदरी येथे अंबिका मातेचा आजपासून यात्रोत्सवास प्रारंभ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**लिंपणगाव :** सालाबाद प्रमाणे अंबिका मातेचा यात्रा उत्सव सोमवारी २३ व २४ मार्च पर्यंत मंगळवारी रोजी मोठ्या उत्सहात संपन्न होईल असे यात्रा कमिटीचे अध्यक्ष साहेबराव महारनूर यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. यात्रा उत्सवाची अधिक माहिती देताना अध्यक्ष श्री महानोर पुढे बोलताना ते म्हणाले की, दोन दिवस चाललेल्या यात्रा उत्सवात पहिल्या दिवशी पहाटे १:०० वाजल्यापासून दंडवत सुरु होतील व पहाटे ५:०० वाजता विधिवत अभिषेक होईल व ६ वाजता आरती होईल.. ११:०० नैवाद्य आरती होईल व दिवसभर दर्शन सुरु राहील रात्री ८:०० धूप आरती छबीना पालखी फटाक्यांची अतिशबाजी होईल व ठीक ९:०० वा.वसंत नांदवळकर यांचा लोकनाट्य तमाशा होईल दुसऱ्या दिवशी ९:०० हाजऱ्या होतील.

दुसऱ्या दिवशी नित्य नियमित आरती नंतर दिवसभर दर्शन सुरु राहील व संध्याकाळी ४:०० वा कुस्त्यांचा जंगी आखाडा होईल कुसत्या वजनावर घेतल्या जातील सकाळी ११:०० ते दुपारी २:०० पर्यंत तटाकेश्वर मंदिरात वजने घेतली जातील उशिरा येणाऱ्या पहिलवान यांचे वजन होणार नाही यांची नोंद घ्यावी.

यात्रा उत्सव सुरक्षित पार पडण्यासाठी पोलीस प्रशासन यांना पाचारण करण्यात आलेले आहे. व यात्रेदरम्यान सर्वत्र सीसी टीव्ही बसवण्यात आलेले आहेत. त्यामुळे महिलांना लहान मुलांना कुठल्याही प्रकारचे गैरवर्तन होईल, असे कृत्य करू नये. व हा सदरचा यात्रा उत्सव आनंदाने पार पाडण्याकामी सर्वांनी सहकार्य करावे, असे यात्रा कमिटीच्या वतीने आव्हान करण्यात आले आहे.

# विवाह जुळविताना अवाजवी अपेक्षा टाळून, सामंजस्याची भूमिका स्वीकारावी : फुलसौंदर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** बदलत्या सामाजिक रचनेमुळे विवाह जुळविणे ही सर्व समाजासाठी मोठी गरज बनली असून, विभक्त कुटुंब पद्धती, नोकरी-व्यवसाय आणि सोशल नेटवर्किंगमुळे परस्पर भेटीगाठी कमी झाल्याने मुला-मुलींचे विवाह जुळविताना अनेक अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे पालकांनी अवाजवी अपेक्षा न ठेवता सामंजस्याची भूमिका स्वीकारावी, असे आवाहन माजी महापौर भगवान फुलसौंदर यांनी केले.

रयत प्रतिष्ठान, जय युवा अकॅडमी, जनवार्ता, क्रांती ज्योती बहुउद्देशीय संस्था, समृद्धी बहुउद्देशीय महिला संस्था, सावित्रीबाई फुले महिला संस्था, श्री संत सावता माळी युवक संघ तसेच जागृती बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय माळी वधू-वर मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली.

या वेळी ज्येष्ठ नगरसेवक बाळासाहेब बोराटे, शहर बँकेचे व्हाइस चेअरमन प्रा. माणिक विधाते, किशोर डागवाले, नगरसेविका आशाताई डागवाले, साहेबराव निधाने, दत्ता जाधव, मंगलताई भुजबळ, सारंग पंधाडे, मच्छिंद्र बनकर, प्रा. सिताराम जाधव, ड. महेश शिंदे, प्रा. अश्विनी जाधव, ड. पोपटराव बनकर, जयश्रीताई शिंदे, स्वाती बनकर, ड. दिनेश शिंदे, नितीन डागवाले, दर्शन बनकर, अनंत द्रविड, प्रा. संजय पडोळे, तुषार रणनवरे, रामेश्वर राऊत आदींसह समाजबांधव व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

यावेळी पुढे बोलताना भगवान फुलसौंदर म्हणाले की, बदलत्या काळानुसार केवळ सरकारी नोकरी करणारा वधू-वर मिळावा या अपेक्षेवर ठाम राहणे योग्य नाही. अनेक तरुण-तरुणी उद्योग-व्यवसायात पुढे जात आहेत. त्यामुळे त्यांच्या स्वभाव, निर्व्यसनी जीवनशैली आणि कुटुंब पार्श्वभूमीचा विचार करून विवाह जुळविणे आवश्यक आहे. लग्न करताना अहंकार बाजूला ठेवून तडजोडीची भूमिका घेणे काळाची गरज बनली आहे. शिक्षण आणि करिअरमुळे विवाहाचे वय वाढत असून, योग्य वेळी विवाह होणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात ॲड. महेश शिंदे यांनी सांगितले की, समाजाची गरज ओळखून मागील काही वर्षांपासून हा वधू-वर मेळावा आयोजित केला जात आहे. मागील वर्षात ४५ विवाह जुळविण्यात यश आले असून, यामध्ये अनेकांचे लग्न होऊन संसार स्थिरावले आहेत. या उपक्रमातून समाजातील अनेक कुटुंबांना आधार मिळत असल्याचे समाधान असल्याचे त्यांनी व्यक्त केले.

## खंडणीसाठी टोळीचा हैदोस
# श्रीगोंद्यात आईस्क्रीम विक्रेत्या महिलेला लोखंडी गजाने मारहाण; पाच जणांवर गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा - पारगाव रस्त्यावरील महात्मा फुले उद्यानासमोर रात्रीच्या सुमारास आयस्क्रीम व्यवसाय करणाऱ्या एका महिलेवर दरमहा ५०,००० खंडणीची मागणी करत लोखंडी गज व लाथाबुक्क्यांनी अमानुष मारहाण केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ही घटना घडली. याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात ५ जनावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

श्रीगोंदा शहरातील कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उभं करणारी धक्कादायक घटना समोर आली आहे.श्रीगोंदा - पारगाव रस्त्यावरील महात्मा फुले उद्यानासमोर रात्रीच्या सुमारास आयस्क्रीम व्यवसाय करणाऱ्या एका महिलेवर हल्ला करत दरमहा ५० हजार रुपयांची खंडणी मागण्यात आली खंडणी देत नाही म्हणून महिलेला मारहाण करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार घडला असून जागा आमच्या ताब्यात... पैसे द्या नाहीतर परिणाम भोगा! असे म्हणत मारहाण करण्यात आली आहे पीडित महिला पूनम दिनेश शिंदे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी बहुल्या गुलाब काळे, त्याची आई संगीता काळे, पत्नी व इतर दोन महिलांनी एकत्र येत त्यांना धमकावत दरमहा छ५० हजारांची खंडणी मागितली. ही जागा आमच्या ताब्यात आहे, इथे दुकान लावायचं असेल तर पैसे द्यावे लागतील, असा दबाव टाकण्यात आला.त्या महिलेने नकार देताच लोखंडी गजाने हल्ला चढवला त्यावेळी नागरिकांनी प्राण वाचवले घटनेच्या वेळी शिंदे एकट्या असताना आरोपींनी अचानक हल्ला चढवला. बहुल्या काळे याने लोखंडी गजाने हात, पाठ व कंबरेवर वार केले, तर इतर महिलांनी खाली पाडून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. परिसरातील नागरिकांनी धाव घेत हस्तक्षेप केल्याने मोठा अनर्थ टळला.मात्र पैसे नाही दिले तर जिवंत सोडणार नाही!मारहाणीनंतरही आरोपींनी पुन्हा धमकी देत, खंडणी दिली नाही तर तुला आणि तुझ्या नवऱ्याला जिवंत ठेवणार नाही, असा इशारा दिला. या घटनेमुळे व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या प्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात बहुल्या काळे व त्याच्या साथीदारांवर मारहाण, खंडणी मागणी व धमकी देण्याचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पुढील तपास पोलीस करत आहेत. मात्र याप्रकरणी ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त होत असून दोषीवर कठोर कारवाईची मागणी करण्यात येत होती घटनेची माहिती मिळताच संतप्त नागरिकांनी पोलीस ठाण्याबाहेर मोठ्या संख्येने गर्दी केली. आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करावी, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला.

> **मानसिकता वाढतेय ?**
> श्रीगोंद्यात उद्योग करायचा तर खंडणी द्यावी लागते, अशी भीषण मानसिकता वाढत असेल तर सामान्य माणूस जगायचं कसं? असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला असूंन श्रीगोंद्यात 'गुंडगिरी विरुद्ध व्यवसाय' अशी परिस्थिती निर्माण होत असल्याचे चित्र आहे. प्रशासनाने आता कडक पावले उचलली नाहीत, तर हा खंडणीचा बाजार अजून फोफावण्याची भीती व्यक्त होत आहे.

# रमजान ईदमुळे समाजात बंधुभाव वाढतो : फारूक सय्यद

**अहिल्यानगर :** नगर तालुक्यातील नेप्ती येथे मुस्लिम समाजाची रमजान ईद (ईद-उल-फित्र) उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त गावातील मुस्लिम बांधवांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ईद मिलन कार्यक्रमातून हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रभावी दर्शन घडले. या कार्यक्रमात हिंदू समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होत मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. सकाळी शाही मस्जिदच्या मैदानावर मुस्लिम बांधवांनी सामुदायिक नमाज अदा केली. मौलाना मुनीर सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली नमाज पठण करून देशात शांतता, सुख-समृद्धी व धार्मिक सलोखा टिकून राहावा, यासाठी प्रार्थना करण्यात आली, अशी माहिती रामदास फुले यांनी दिली. संध्याकाळी आयोजित ईद मिलन कार्यक्रमात गावातील वाड्या-वस्तीवरील सर्व समाजातील नागरिक एकत्र आली होती. यावेळी हिंदू- मुस्लिम ऐक्याचे दर्शन घडत होते . यावेळी सर्वांनी पारंपरिक शीरखुर्माचा आस्वाद घेत एकमेकांप्रती प्रेम व आपुलकी व्यक्त केली. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य अरुण होळकर, माजी उपसरपंच फारुख सय्यद ,जिल्हा नियोजन समितीचे सदस्य शिवाजी होळकर, माजी पं. स. सदस्य देवा होले , सरपंच संजय अशोक जपकर, रामदास फुले, माजी उपसरपंच संजय आसाराम जपकर ,दादू चौगुले, जालिंदर शिंदे ,चेअरमन सुरेंद्र होळकर , बाबूलाल सय्यद, मार्केट कमिटीचे माजी संचालक वसंतराव पवार, प्रा. एकनाथ होले, आदी उपस्थित होते.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री



## भेसळयुक्त दूध प्रकरणात १६ जणांचा मृत्यू; आंध्रप्रदेश हादरला



**गोदावरी :** आंध्र प्रदेश राज्यातील गोदावरी जिल्ह्यात भेसळयुक्त दूध पिल्यामुळे १६ जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. तर आणखी तीन जणांची प्रकृती गंभीर असून मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त होत आहे.मिळालेल्या माहितीनुसार, लालाचेरुवु, चौदेस्वरनगर व स्वरूपनगर या भागात फेब्रुवारी महिन्यापासून भेसळयुक्त दूध विक्री सुरू होती. दूध पिल्यानंतर नागरिकांना मळमळ, उलटी, पोटदुखी, लघवी बंद होणे तसेच मूत्रपिंड निकामी होण्यासारखे गंभीर त्रास जाणवू लागले. सुरुवातीला २२ फेब्रुवारी रोजी काही तक्रारी समोर आल्या होत्या.तपासात नरसापूरम येथील एका डेअरीमधून हे भेसळयुक्त दूध पुरवले जात असल्याचे स्पष्ट झाले. या दुधात 'एथिलीन ग्लायकॉल' हा विषारी पदार्थ मिसळल्याचे समोर आले आहे. या प्रकरणात २० हून अधिक रुग्णांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून अनेकांवर डायलॅसिस व व्हेंटिलेटरवर उपचार सुरू आहेत.दरम्यान, संबंधित डेअरीविरुद्ध चौकशी सुरू असून दोषींवर कठोर कारवाईची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## घोषणांनी दणाणला दसरा मैदान
# ओबीसींचा भव्य महामोर्चा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**भंडारा :** जय ओबीसी, जय संविधान, ओबीसी एकता जिंदाबाद, उठ ओबीसी जागा हो, आंदोलनाचा धागा हो अशा घोषणा देत दसरा मैदानावरून सकल ओबीसी महामोर्चाच्या नेतृत्वाखाली भव्य महामोर्चा काढण्यात आला. मोठ्या संख्येने ओबीसी बांधव या मोर्चात सहभागी झाले होते.

मोर्चादरम्यान परिसर घोषणांनी दणाणून गेला होता. ओबीसी समाजाच्या विविध मागण्यांसाठी हा महामोर्चा काढण्यात आला असून संघटितपणे आपली ताकद दाखवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. मोर्चात महिला, युवक व विविध संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

दूरवरील गावखेड्यातील नागरिकांसमवेत विविध शहरांतील नागरिक उत्स्फुर्तपणे सहभागी झाले. महिलांसह वृद्ध, तरूण-तरूणीही रखरखत्या उन्हात हाती फलक व गळ्यात पिवळा दुपट्टा घालून एकतेचा व समतेचा आवाज उंचावतांना दिसल्या. प्रत्येकाच्या तोंडी ओबीसींची जनगणना झालीच पाहिजे, युजीसी समता विधेयक लागू करा, ओबीसींसाठी स्वतंत्र मंत्रालय सुरू करावे, हा नारा होता.

सकाळी ११ वाजता दसरा मैदानावरून निघालेला मोर्चा गांधी चौक-पोस्ट ऑफीस चौकाने मार्गस्थ होत जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील त्रीमूर्ती चौकात धडकला. तेथे मोर्चाचे रूपांतर सभेत झाले. यावेळी मंचावरील ओबीसी संघटनांच्या पुढाऱ्यांनी केंद्र व राज्य शासनाच्या ओबीसी विरोधी धोरणांचा खरपूस घेतला. सत्ताधारी रंग बदलणाऱ्या सरड्यासारखे असून, यांचा डीएनए कधीच ओबीसींचा नव्हता व राहणार नाही, अशी टिका केली. हे सरकार कुत्र्यांची व गाढवांची प्रगणना करते, परंतु ओबीसींची करीत नाही. ओबीसींची मुले शिक्षणापासून वंचित राहून गुलामीत व गुरढोर राखीत शेतातच मरावे, अशी विकृत मानसिकता राज्यकर्त्यांची असल्याचा प्रहार यावेळी करण्यात आला. ओबीसींनो, एक कायम लक्षात ठेवा जे ओबीसींना सहकार्य करतात, त्यांनाच निवडणुकीत सहकार्य करा, असे जाहीर आवाहन करण्यात आले.

### जनगणनेवर बहिष्कार टाकण्याचे आवाहन

ओबीसी जनगणना होत नसेल तर संपूर्ण समाजाने जनगणनेवर बहिष्कार घालावे, घरी आलेल्या प्रगणकास माहिती देवू नये, असे जाहिर आवाहन याप्रसंगी करण्यात आले. देशात ओबीसींची लोकसंख्या ५२ टक्केपेक्षा अधिक असतांना जाणीवपूर्वक तुटपूंजा निधी मंजूर केला जातो. त्यामुळे ओबीसींची जनगणना होत नाही, तोपर्यंत ओबीसींचा लढा सुरू ठेवण्याचा निर्धार एकमताने जाहीर करण्यात आला. लवकरच आंदोलनाचा पुढील टप्पा सुरू करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

## ज्वारी करताना मशीनमध्ये अडकून वनपुरीच्या शेतकरी महिलेचा मृत्यू

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**माळशिरस :** शेतातील ज्वारी काढून झाल्यानंतर मशीनमध्ये कणसे टाकून दाणे करीत असताना शेतकरी महिलेचे डोके अडकून दुर्दैवी मृत्यू झाल्याची येथे दि. १८ रोजी घटना घडली आहे. हि घटना एवढी भयानक होती कि पाहणाऱ्या लोकांचा अक्षरशः थरकाप उडाला. डोक्याला बाधलेले स्कार्फ मशिनच्या चक्रात अडकले. त्याबरोबर महिला मशीनमध्ये ओढल्या गेल्या. त्यांच्या सोबत काम करणाऱ्या घरातील व्यक्तींना काही कळायच्या आत मुंडके एका बाजूला आणि शरीर दुसऱ्या बाजूला फ ेकले गेले. आणि काही क्षणात त्यांचा मृत्यू झाला.

मंगल तुकाराम कुंभारकर वय ५५. रा वनपुरी ता पुरंदर असे या घटनेत दुर्दैवी मृत्यू झालेल्या महिलेचे नाव असून याबाबत दत्तात्रय रोहीदास यादव,, रा. माळशिरस ता पुरदर यांनी जेजुरी पोलीस ठाण्यात घटनेची माहिती दिली आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे कि, मयत महिला मंगल तुकाराम कुंभारकर या त्यांचा मुलगा विकास तुकाराम कुंभारकर असे माळशिरस मधील पाटीलवस्ती येथील शेतामध्ये ज्वारीची कणसे मळणी मशीन मध्ये टाकून ज्वारी करीत होते. तसेच मशीन मालक नामदेव भानुदास बनकर रा, राजुरी. ता.पुरंदर हेही मशीनजवळच उभे होते.दरम्यान मशीनच्या खाली पडलेली कणसे गोळा करून मशीनमध्ये टाकत असताना मयत मंगल कुंभारकर यांच्या डोक्याला बांधलेले स्कार्फ तसेच अंगातील शर्ट आणि डोक्याचे केस मळणी टॅक्टरच्या मागच्या बाजूकडील शाप्ट व मळणी म शीनचे जॉइन्ट मध्ये अडकुन मशीन मध्ये ओढल्या गेल्या. त्यांचे डोके मशीन मध्ये अडकल्याचे दिसताच त्याच वेगाने मशीन बंद करण्याचा प्रयत्न केला. मात्र मशीन बंद करण्यापूर्वीच काही सेकंदात मंगल कुंभारकर यांचे मुंडके तुटून एका बाजूला तर शरीर मशिनच्या दुसऱ्या बाजूला वेगाने फेकले गेले.

मशीनचा अपघात एवढा विचित्र होता कि, त्यांच्या मुलासामोरच घटना घडली, त्यामुळे काही क्षण काय करावे हेही त्यांना समजेना. जन्मदात्या आईचा डोळ्यासमोरच झालेला करुण अंत पाहून सर्वच सुन्न झाले. त्याही अवस्थेत त्यांना तातडीने जेजुरी येथील ग्रामीण रुग्णालय येथे उपचारासाठी हलविण्यात आले. मात्र त्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला होता.

# जिद्द, चिकाटी अन् सातवा प्रयत्न...

## केडगावच्या अभिषेक बिडकर यांची 'लेफ्टनंट' पदाला गवसणी!

पूनम नवले | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** यशाचा मार्ग फुलांचा नसतो, तो काट्याकुट्यांचा आणि संघर्षाचा असतो. पण ज्याच्याकडे न थकता लढण्याची जिद्द असते, तोच ध्येयाचे शिखर सर करतो. हे वाक्य अहिल्यानगरमधील केडगावचे सुपुत्र अभिषेक प्रकाश बिडकर यांनी सार्थ ठरवले आहे. भारतीय सैन्याच्या प्रतिष्ठित 'मेकॅनाइज्ड इन्फंट्री रेजिमेंट' मध्ये 'लेफ्टनंट' (क्लास-१ अधिकारी) म्हणून निवड होऊन अभिषेक यांनी जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

अभिषेक यांचे प्राथमिक शिक्षण केडगावच्या कारमेल कॉन्व्हेंट स्कूलमध्ये झाले. मात्र, देशसेवेची ओढ त्यांना छत्रपती संभाजीनगरला घेऊन गेली. येथील डिफेन्स करिअर अकॅडमीमध्ये शिक्षण घेत असतानाच त्यांच्या मनात भारतीय सैन्यात अधिकारी होण्याचे स्वप्न रुजले.

### एनडीएतील अपयश अन् इंजिनिअरिंगचा टप्पा

अनेकांना वाटते की पहिल्याच प्रयत्नात यश मि ळाले नाही तर मार्ग संपला. अभिषेक यांना 'एनडीए' परीक्षेत अपयश आले, पण त्यांनी हार मानली नाही. त्यांनी पुण्यातील श्रीमती काशिबाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधून मेकॅनिकल इंजिनिअरिंगची पदवी पूर्ण केली. महाविद्यालयीन काळात केवळ पुस्तकी कीड न बनता, त्यांनी 'स्टॅलियन मोटरस्पोर्ट' क्लबमध्ये इलेक्ट्रिक रेस कार प्रकल्पावर काम केले. याच अनुभवातून त्यांचे नेतृत्व आणि तांत्रिक कौशल्य तावूनसुलाखून निघाले.

अभिषेक बिडकर यांचा हा प्रवास आज स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या प्रत्येक तरुणासाठी प्रेरणादायी आहे. एक सामान्य मुलगा आपल्या जिद्दीच्या जोरावर भारतीय सैन्यात 'क्लास-१' अधिकारी होऊ शकतो, हे त्यांनी सिद्ध केले आहे.



### १३ लाखांतून 'टॉप ३००' मध्ये स्थान

भारतीय सैन्याची निवड प्रक्रिया ही जगातील सर्वात कठीण प्रक्रियांपैकी एक मानली जाते. तब्बल १३ लाख विद्यार्थ्यांमधून केवळ ३०० जणांची निवड झाली, त्यात अभिषेक यांनी आपले स्थान निश्चित केले. हा प्रवास सोपा नव्हता. सातव्या प्रयत्नात त्यांनी एसएसबी मुलाखत पार केली. पाच दिवसांच्या अत्यंत कठीण मानसिक, शारीरिक आणि वैद्यकीय चाचण्यांना धैर्याने सामोरे जात त्यांनी आपले 'लेफ्टनंट' होण्याचे स्वप्न सत्यात उतरवले.

### अभिषेक यांच्या प्रवासातून मिळणारे 'यशाचे मंत्र'

१. सातत्य : पहिल्या, दुसऱ्या किंवा सहाव्या प्रयत्नात अपयश आले तरी खचून न जाता सातव्या प्रयत्नात यश मिळवणे, हाच खरा विजय आहे.
२. पर्याय शोधणे : एनडीए नाही जमले तरी इंजिनिअरिंग पूर्ण करून तांत्रिक ज्ञानाच्या जोरावर पुन्हा सैन्यात जाण्याचा मार्ग त्यांनी निवडला.
३. कौशल्य विकास: केवळ अभ्यास न करता इंटर्नशिप आणि प्रत्यक्ष प्रकल्पांवर काम केल्याने व्यक्तिमत्व प्रगल्भ होते.
४. कौटुंबिक पाठबळ: वडील प्रकाश बिडकर, आई विजया आणि बहीण गौरी यांच्या खंबीर पाठिंब्यामुळे अभिषेक यांनी गया (बिहार) येथील ऑफिसर्स ट्रेनिंग अकॅडमीतून आपले खडतर प्रशिक्षण पूर्ण केले.

■ अपयश ही यशाची पहिली पायरी आहे, हे फक्त म्हणण्यापुरते मर्यादित ठेवू नका. जोपर्यंत ध्येय गाठत नाही, तोपर्यंत स्वतःला झोकून द्या. प्रयत्न प्रामाणिक असतील, तर नशिबालाही झुकावे लागते.

– लेफ्टनंट अभिषेक बिडकर

## टाकळीभान येथे बेकायदेशीर शिवाजी महाराजांचा पुतळा; अज्ञाताविरुद्ध गुन्हा

**श्रीरामपूर :** तालुक्यातील टाकळीभान येथे नेवासा ते श्रीरामपूर जाणारे रोडचे उजवे बाजुला राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५० रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम उपविभाग श्रीराम पूर यांच्या मालकी हक्काच्या जागेत मध्यरात्री उशिराने कोणीतरी अज्ञात इसमाने अनाधिकृत विनापरवाना छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुर्णाकृती पुतळा उभारला. याप्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. टाकळीभान येथे नेवासा ते श्रीरामपूर जाणारे रोडचे उजवे बाजुला राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५० रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम उपविभाग श्रीरामपूर यांच्या मालकी हक्काच्या जागेत कोणीतरी विनापरवाना छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुर्णाकृती पुतळा उभारला असल्याचे पत्र सार्वजनिक बांधकाम उपविभाग श्रीरामपूर येथे मिळाल्याने तेथे जाऊन सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे सहाय्यक अभियंता अनुराग अच्युतराव हातमोडे व बापुसाहेब बी वराळे यांनी खात्री केली असता दि. ६ मार्च २०२६ रोजी मध्यरात्री उशिराने कोणीतरी अज्ञात इसमाने अनाधिकृत विना परवाना छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा हा बेकायदेशीर असुन तो कोणीतरी अज्ञात इसमांनी महापुरुषांचा अपमान होईल या हेतुने हा पुतळा उभारलेला आहे.

## नाशिकनंतर नांदेडमध्ये महाराजाचा महिलेवर अत्याचार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नांदेड :** नाशिकमधील कॅप्टन अशोक खरात प्रकरण राज्यभर गाजत असताना नांदेडमध्ये देखील असा एक संतापजनक प्रकार समोर आला आहे. एका मठातील म हाराजाने लग्नाचे आमिष दाखवून ४७ वर्षीय महिलेवर अत्याचार केल्याचे उघड झाले आहे.

याप्रकरणी भाग्यनगर पोलिसांनी म हाराजाला अटक करत गुन्हा दाखल केला आहे. नाशिकनंतर नांदेडमध्ये घडलेल्या या घटनेनं खळबळ उडाली आहे. संत हरीगीर दत्तगीर गिरी महाराज (वय ३८) असं अटक करण्यात आलेल्या महाराजाचे नाव आहे.

याबाबत अधिक माहिती अशी,

नांदेड शहरातील गाडीपुरा भागात महंत बाळगीर महाराज मठ आहे. या मठाचे संत हरीगीर दत्तगीर गिरी महाराज प्रमुख आहेत. दर पौर्णिमा आणि अमावस्याला भाविक दर्शनासाठी मठात गर्दी करत असतात. भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पीडित महिला देखील १२ मे २०२५ रोजी मठात दर्शनसाठी गेल्या होत्या. यावेळी महाराज आणि पीडित महिलेशी ओळख झाली. महाराजाने महिलेचा मोबाईल नंबर घेतला, त्यानंतर दोघांमध्ये फोनवर संभाषण सुरु होते. जून महिन्यात महिलेने महाराजाला गुरु केलं.

'मी संन्याशी आहे...' दरम्यान, 'माझा वाढदिवस आहे. शुभेच्छा देण्यासाठी तू माझ्या घरी ये', असं तगादा महाराजाकडून लावला जात होता. शिवाय लग्नाचं आमिष दाखवून महाराजाने महिलेच्या घरी जाऊन शरीर सुखाची मागणी करत अत्याचार केला, असा आरोप पीडित महिलेनं केला आहे. लग्नाबाबत विचारणा केल्यानं 'मी संन्याशी आहे, लग्न करू शकत नाही. पैसे घेऊन प्रकरण मिटवून घे', अशी धमकी देखील दिली. या प्रकरणी पीडित महिलेच्या तक्रारीवरून भाग्यनगर पोलिसांनी कलम ६९, ३५१(२) अंतर्गत गुन्हा दाखल केला. संशयित आरोपी संत हरीगीर दत्तगीर गिरी महाराज याला अटक करण्यात आली आहे.

'मास्टरमाइंड' नीरज जाधवचा फोटो समोर

नाशिकसह अवघ्या महाराष्ट्रात खळबळ उडवणाऱ्या 'कॅप्टन फाईल्स' अशोक खरात प्रकरणातील सर्वात मोठा आणि धक्कादायक कृत्याचा सूत्रधार दुसरा कोणी नसून संशयित अशोक खरातसोबत राहणारा ऑफिस बॉय नीरज जाधव असल्याचं उघड झालं आहे. त्याच ओजस प्रॉपर्टीजच्या बंद दाराआड १०० हून अधिक महिलांच्या लैंगिक शोषणाचे व्हिडिओ करून आपल्याच मालकाला ५ कोटींच्या खंडणीसाठी ब्लॅकमेल करणाऱ्या या मास्टरमाइंडचा फोटो आता समोर आला आहे.

## गोंडेगावात शासकीय परवानगी न घेता महाराजांचा अश्वारुढ पुतळा बसविला, गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** तालुक्यातील गोंडेगावमध्ये प्राथमीक शाळेच्या गेट समोर, ग्रांमपंचायत जागेम ध्ये कोणीतरी अज्ञात इसमांनी कोणतीही शासकीय परवानगी न घेता महापुरुषांचा अपमान होईल या हेतुने छत्रपती शिवाजी म हाराजांचा अश्वारुढ पुतळा बसविला. प्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

श्रीरामपूर तालुक्यातील गोंडेगाव येथे ग्रामपंचायत अधिकारी रामदास फक्कडराव जाधव यांना माहिती मि ळाली की, गोंडेगावमध्ये प्राथमीक शाळेच्या गेट समोर, ग्रांमपंचायत जागेमध्ये कोणीतरी अज्ञात इसमांनी विना परवानगी छत्रपती शिवाजी म हाराजांचा अश्वारुढ पुतळा बसवलेला आहे. असे कळविल्याने खात्री केली असता दि. १९ मार्च २०२६ रोजी मध्यरात्री उशिराने प्राथमिक शाळेच्या गेट समोर, गोंडेगाव येथे ग्रांमपंचायत जागेमध्ये विना परवानगी कोणीतरी अज्ञात इसमांनी महापुरुषांचा अपमान होईल या हेतुने छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा बसवलेला आहे.

यांप्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात ग्रामपंचायत अधिकारी रामदास फक्कडराव जाधव यांनी फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# युद्धाची सावली अन् रिकाम्या टाकीची धडधड...

## अहिल्यानगरमध्ये 'गॅस'साठी एक लाख ग्राहकांची धावपळ

### जिल्ह्यातील गॅस ग्राहकांची प्रतिक्षा यादी व दैनंदिन वितरण

| कंपनी | एकूण ग्राहक | प्रतीक्षा यादी | दैनंदिन वितरण |
|---|---|---|---|
| BPCL | ७,८७,४६९ | ७५,५५३ | १४,१०० |
| HPCL | ४,७७,६३० | २७,४६९ | ८,९०० |
| IOCL | ९५,६७४ | ६,७३९ | १,८०० |
| **एकूण** | **१३,६०,७७३** | **१,०९,७६१** | **२४,८००** |



### गॅस ग्राहकांसाठी प्रशासनाच्या सूचना

* अफवांवर विश्वास ठेवू नका: गॅस कंपन्यांकडे सध्या ४०,५३९ सिलिंडरचा साठा गोदामांमध्ये उपलब्ध आहे.
* साठेबाजी टाळा: गरजेपेक्षा जास्त बुकिंग केल्यामुळे खऱ्या गरजूंची प्रतीक्षा लांबत आहे.
* कायदेशीर इशारा: घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर करणे हा जीवनावश्यक वस्तू कायद्या'नुसार गंभीर गुन्हा आहे.
* 'पॅनिक बुकिंग' थांबवा: युद्ध सीमेवर असले तरी, त्याचे परिणाम आपल्या स्वयंपाकघरात पोहोचू नयेत, यासाठी 'पॅनिक बुकिंग' थांबवणे हेच सध्या अहिल्यानगरकरांच्या हाती आहे.

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शेकडो मैल दूर इराण आणि अमेरिका-इस्रायल यांच्यात धगधगणाऱ्या युद्धाच्या ठिणगीने अहिल्यानगर जिल्ह्यातील घराघरातील साखळी ओढली गेली आहे. पुरवठा सुरळीत असूनही, केवळ 'उद्या काय होईल?' या भीतीपोटी नागरिकांनी गॅस बुकिंगचा धडाका लावल्याने जिल्ह्यात चक्क १ लाख ९ हजार ७६१ ग्राहक सध्या प्रतीक्षा यादीवर आहेत. प्रशासनाकडून संयमाचे आवाहन केले जात असले, तरी भीतीचा हा 'बुडबुडा' सामान्यांच्या चिंतेत भर टाकत आहे.

भीतीचा बाजार आणि रिकाम्या टाक्यांची रांग जिल्ह्यात बीपीसीएल, एचपीसीएल आणि आयओसीएल या तीन कंपन्यांचे मिळून १०९ वितरक आहेत. दररोज २५ हजार सिलिंडरचे वाटप करूनही प्रतीक्षा यादी कमी होण्याचे नाव घेत नाहीये. याचे मुख्य कारण म्हणजे युद्धामुळे भविष्यात तुटवडा निर्माण होईल, या अफवा. यामुळे ज्यांच्याकडे गॅस शिल्लक आहे, ते देखील घाईघाईने 'रिफिल' बुक करत आहेत.

एकीकडे घरगुती ग्राहकांची धावपळ सुरू असताना, दुसरीकडे हॉटेल आणि चाय टपऱ्या चालवणाऱ्या छोट्या व्यावसायिकांचे कंबरडे मोडले आहे. व्यावसायिक गॅसच्या पुरवठ्यावर केंद्र सरकारने मर्यादा आणल्याने, जिल्ह्यातील २ हजार ५० सिलिंडरच्या दैनंदिन मागणीपैकी केवळ ६०-७० टक्केच पुरवठा होत आहे. यामुळे अनेक छोटे व्यावसायिक नाईलाजाने घरगुती गॅस वापरण्याच्या जाळ्यात अडकत आहेत.

गॅसचा हा गोंधळ पाहता जिल्हा पुरवठा विभागाने कंबर कसली आहे. तहसीलदार आणि पुरवठा निरीक्षकांची 'भरारी पथके' तैनात करण्यात आली आहेत. विशेषतः हॉटेल आणि व्यावसायिक ठिकाणी घरगुती गॅसचा वापर आढळल्यास थेट गुन्हे दाखल केले जात आहेत.

पुरवठा नियमित आहे, पण लोकांनी भीतीपोटी बुकिंग वाढवले आहे. चार दिवसांच्या आत प्रत्येकाला गॅस मिळतोय, त्यामुळे कुणीही घाबरून साठा करू नये.

**– हेमा बडे,**
**जिल्हा पुरवठा अधिकारी**